‘सो ऽ हं’

# तृतीय वर्ष कला

## तत्त्वज्ञान सामान्य पेपर – ३ : ‘सौंदर्यशास्त्र व सामाजिक तत्त्वज्ञान’

जून २०११ पासून सुरू झालेल्या अभ्यासक्रमावरील मार्गदर्शक नोट्स

तर्फे

प्रा. डॉ. विजय बाणकर, ‘माहेर’, महाविद्यालयाजवळ, अकोले – ४२२६०१, जि. अहमदनगर
**Phone No. : 02424 221495 & Mobile Phone No. : 9011604011, E-mailID : vijaymaher@gmail.com**

⇨ **द्वितीय सत्रातील काही** ⇨ + प्रथम सत्रातील काही नोट्स

### ☯ धर्म या संज्ञेचे अर्थ : –

धर्म हा शब्द अनेक अर्थांनी वापरला जातो. ‘महाराष्ट्र शब्दकोशात’ धर्म या संज्ञेचे पुढील अर्थ / अभिप्राय सांगितले आहेत :

१. मनुष्याला सदाचरणास लावणारे, परमेश्वरचिंतनाचा मार्ग दाखवून देणारे पंथ म्हणजे धर्म होय. उदा. हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन वगैरे

२. परमेश्वरप्राप्तीची साधना, धार्मिक विधीयुक्त क्रिया, उपासना करणे म्हणजे धर्म होय.

३. रूढी, परंपरा, शास्त्रे यांनी सांगितलेले नियम पाळणे, आचार व पवित्र विधी करणे म्हणजे धर्म होय.

४. शास्त्रानुसार वागताना अंगी बाळगावयाचे नैतिक सद्‌गुण यांचा विकास करणे म्हणजे धार्मिक असणे होय.

५. सामाजिक न्यायाची, व्यवस्थेची तत्त्वे व कायदा म्हणजे धर्म होय.

याव्यतिरिक्त धर्माचे आणखीही काही अर्थ सूचित केले गेले आहेत. उदा. नैतिक दृष्टिकोन, सामूहिक हितासाठी सामाजिक कायद्यापुढे नतमस्तक होणे व जीवनातील प्रत्येक कृती ईश्वराला अनुलक्षून (*गीतेत अर्जुनाला सांगितल्याप्रमाणे* अनुस्मरून) करणे, ही धार्मिकतेची अंगे मानली जातात.

जॉन मॉर्टिन्यू, फर्म, फ्रेजर वगैरे धर्मशास्त्रज्ञांनी धर्माची व्याख्या करताना / धर्माचे स्वरूप स्पष्ट करताना धर्मसंकल्पनेची सर्वसमावेशकता किंवा संकुलता (कॉम्प्लेक्स नेचर) लक्षात घेऊन धर्मात समाविष्ट होणाऱ्या घटकांची यादी दिली आहे. ती पुढीलप्रमाणे :–

१. अतिनैसर्गिकांवरील म्हणजे देव, दैवतांवर विश्वास,

२. पवित्र व अपवित्र वस्तूंमधील भेदाची भावना व पवित्र वस्तूंबाबत पूज्य बुध्दी, गूढ आकर्षण व व्रत विधी,

३. पवित्र मानलेल्या वस्तूंबाबत काही चूक झाली तर अपराध–भावना,

४. ईश्वराच्या संबंधात प्रार्थना व अन्य स्वरूपाची निवेदने,

५. सामान्य व धार्मिक अनुभवांना अधिष्ठान देणारी सत्ता व तिच्याबाबत दृष्टिकोन म्हणजे वैयक्तिक व सामाजिक नीती यावर आधारित आचरण.

थोडक्यात, समाजाचा एक घटक म्हणून व्यक्ती–वर्तनाचे ईश्वरनिष्ठेच्या दृष्टिकोनातून नियमन करणे म्हणजे धर्म होय. धर्माचरणामुळे व्यक्तीचे भौतिक, ऐहिक, सामाजिक व पारलौकिक जीवन समृध्द होते. म्हणून परमेश्वराला उद्देशून दैनंदिन जीवनातील प्रत्येक कृती सश्रध्द अंत:करणाने करणे म्हणजे धर्म होय. या व्याख्येनुसार हिंदू, इस्लाम, शीख, ख्रिश्चन इत्यादी धर्म ओळखले जातात.

### ☯ धर्मविकासाच्या तीन अवस्था = धर्माचे तीन प्रकार : –

धर्माचा १. ऐतिहासिक, २. समाजशास्त्रीय आणि ३. मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करून मानवी संस्कृतीतील धर्म–जीवनाचा (धर्मभावनेचा / धार्मिकतेचा) उदय व विकास याबाबत समालोचन करून विचारवंतांनी काही अंदाज केले आहेत.

**धर्मविकासाच्या तीन अवस्था : –**

धर्माचा उदय, विकास व विकासावस्था स्पष्ट करताना गॅलोवे यांनी आपल्या 'फिलॉसॉफी ऑफ रिलीजन' या पुस्तकात १. टोळी धर्म (ट्रायबल रिलीजन), २. राष्ट्रीय / राष्ट्र धर्म (नॅशनल रिलीजन), ३. विश्व धर्म (यूनिव्हर्सल रिलीजन) असे वर्गीकरण करून त्यांचे स्वरूप सविस्तर स्पष्ट केले आहे. मानवी इतिहासाकडे पाहता, प्राचीन टोळयांच्या निसर्गविषयक समजुतीतून निसर्ग धर्म / टोळी धर्म उदयाला आला; तोच धर्म पुढे सुसंघटित, स्थिर व सुव्यवस्थित मानवी समूहाचा राष्ट्रीय धर्म झाला आणि हळूहळू त्याची परिणती अखिल मानवजातीच्या कल्याणासाठीच्या म्हणजे आध्यात्मिक विकासावर भर देणाऱ्या विश्वधर्मात झाली. धर्मविकासाच्या या तीन अवस्थांचा क्रमश: विचार करूयात –

**१. टोळी धर्म : –**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'हिंदू धर्माची समीक्षा' या पुस्तकात धर्मसाधनांचा, धर्मश्रध्दांचा समाजशास्त्रीय विकास स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, आदिम समाज जगण्यासाठी निसर्गशक्तींशी झुंजत होता त्याचवेळी निसर्गाचा व त्यातील घटनांचा अर्थ लावण्याचा तो प्रयत्न करीत होता. त्यातूनच टोळीधर्मातील निसर्गधर्म उदयाला आला. निसर्गात काही गूढ, अतिमानुषी (सुपरह्युमन/ सुपरनॅचरल) सामर्थ्य आहे, असे त्याने मानले. त्याने या सामर्थ्याची पूजा आरंभिली. आपल्याप्रमाणे पदार्थही सजीव आहेत, त्यांतही प्राण आहे (जडप्राणवाद) असे मानून त्याने निसर्गाचे मानवीकरण (ह्युमनायझेशन) व दैवीकरण (डिव्हिनायझेशन) केले आहे.

मानवी मनोव्यापारांचा, धार्मिक मनोव्यापारांचा यादृष्टीने अभ्यास व विचार हा टोळीधर्माचा पाया आहे. ए. ई. टेलर यांच्या मते, सर्व धार्मिक विधींचा पाया जडप्राणवाद हा होय. माणसाने पृथ्वीवरील वृक्षवल्ली, नद्या, पर्वत यांचे दैवीकरण केले, आकाशातील सूर्य, चंद्र, तारका यांना तो दैवी कृती मानू लागला. सृष्टीविषयीची ही श्रध्दा हे टोळीधर्माचे प्रमुख लक्षण आहे.

यानंतर धर्मकल्पना स्वप्नानुभवामुळे बदलत गेली. स्वप्न पाहणारा शरीराहून वेगळा असा कोणीतरी आहे, तो काही काळ शरीर सोडून जाऊ शकतो, पुन्हा शरीरात येऊ शकतो, असे स्पष्टीकरण माणसांनी केले. माणूस म्हणजे शरीर आणि आत्मा यांचे मीलन होय. मृत्यूनंतरही काही शिल्लक राहते, अशी दृढ श्रध्दा टोळीधर्मात विकसित झाली. वर्तमानकाळातील सर्व धर्मांत या श्रध्देचे प्रत्यंतर येते.

यानंतर तांत्रिक / मंत्र उपासना धर्मात शिरली. प्राणी, दैवते, वनस्पती यांची उपासना केल्याने तसेच पिशाच्च, चेटूक यांची आराधना केल्याने वेगवेगळ्या शक्ती प्राप्त होतात, असे मानवाला वाटले / वाटते. अवतीभवतीच्या शक्तींमुळे माणसे आजारी पडतात, बरी होऊ शकतात, असा समज झाल्याने माणूस या वस्तूपुरूषवादात प्रदीर्घकाळ अडकून राहिला. याचा ठळक पुरावा म्हणजे देवकपूजा, कुलदैवतपूजा, पितृपूजा होय. हिंदू धर्माप्रमाणेच अनेक धर्मात अनेक प्रकारची देवके मानली जातात. उदा. घोडा, गरुड, नाग इत्यादी प्राणीदेवके; आंबा, चिंच, बाभुळ, पिंपळ इत्यादी वनस्पतीदेवके तर कुऱ्हाड, सुरा, चिमटा, जाते, तलवार इत्यादी वस्तूदेवके मानली जातात. या देवकप्राण्यांचे मांस न खाणे, त्यांचे चित्र अंगावर गोंदणे, देवकप्राणी मेला तर सुतक पाळणे या प्रथा आपल्या समाजात अद्याप आढळतात. उदा. मंगलप्रसंगी देवकांची पूजा केली जाते.

अज्ञानावस्थेत व धर्माच्या प्राथमिक अवस्थेत वरील गोष्टी आढळून येतात. या गोष्टी फारसा विचार न करता स्वीकारणे हे टोळीधर्माचे लक्षण आहे.

**२. राष्ट्र / राष्ट्रीय धर्म : –**

वर सांगितलेल्या देवकांची पूजा करणारा मानवी समाज टोळयाटोळयांतून विखुरलेला होता. अन्न, पाणी, वस्त्र, निवारा यासाठी आणि विश्व जाणून घेण्याच्या उत्सुकतेपोटी या टोळया हळूहळू इतर टोळयांशी संबंधित झाल्या. मानवांचा समूह विस्तृत होत गेला. विभिन्न मानवांच्या भावना, प्रेरणा, श्रध्दा, ध्येये यांचे एकजिनसीकरण / एकत्रीकरण होऊन सुव्यवस्थित समाजासाठी धर्मप्रणाली निर्माण झाल्या. त्यासाठी भाषा, वंश, जाती, उपजाती, वैवाहिक व कौटुंबिक संबंध, कला, वाङ्मयात्मक, सांस्कृतिक अभिरूची व जीवन यांचे संमिश्रण व समन्वय घडत घडत काळाच्या ओघात एकजिनसी समाज म्हणजे राष्ट्र निर्माण झाले / होते. या राष्ट्रात राहणाऱ्या लोकांना राष्ट्रीयत्व प्राप्त झाले. त्यातील समाजाचा धर्म राष्ट्राच्या चारित्र्याचे प्रतीक बनला. उदा. इजिप्त, ग्रीस, भारत, चीन इत्यादी भूभागांचा इतिहास म्हणजे 'टोळयाटोळयांतून जगणारा समाज ते राष्ट्रधर्मनिर्मिती', असे दिसून येते.

थोडक्यात, स्थिर सामाजिक जीवनाच्या प्रारंभामुळे माणसाचे धार्मिक जीवन अधिक सुरक्षित व नीतिनिष्ठ बनले. समाजातील जीवन माणसाला अधिक सोयीचे वाटले त्यामुळे जीवनावश्यक गरजा भागविण्याच्या विविध रीती शोधल्या गेल्या व त्या स्थिर झाल्या. परिणामी, विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांचा इतर भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांहून वेगळा असा राष्ट्रधर्म विकसित झाला.

राष्ट्रीय धर्माचा संस्कार व अभिमान कायम रहावा म्हणून धार्मिक मानचिन्हे, श्रध्दास्थाने निर्माण झाली. त्याबरोबर त्याभोवती सामाजिक व नैतिक मूल्यांची गुंफण केली गेली. राष्ट्रासाठी जगणे व राष्ट्रासाठी मरणे ही मूल्ये सर्वश्रेष्ठ मानली गेली.

**३. विश्व धर्म : –**

राष्ट्रधर्माने टोळीधर्माच्या तुलनेत माणसाला पशु व माणूस म्हणून अधिक स्थिर व सुखी केले. तथापि माणसातील सुप्त आत्मिक शक्तींना आवाहन करण्याचे किंवा त्यांना जागृत करण्याचे व माणसाला शांत करण्याचे सामर्थ्य राष्ट्रधर्मात नव्हते व नाही, अशी जाणीव विकसित होत गेली. राष्ट्राभिमान हा एकप्रकारे देहाभिमान आहे, 'देह म्हणजेच मी' असे मानणे व त्यानुसार समाज घडविणे म्हणजे पारमार्थिक दृष्टड्ढा अज्ञानाचा डोलारा उभारणेच होय, असे त्याला स्पष्ट होत गेले.

अज्ञानमय जीवन जगण्यात म्हणजे मरेपर्यंत खाणे–पिणे, पोराबाळांना जन्म देऊन पोसणे, विविध प्रकारचे उपभोग घेणे, आपल्या ठिकाणच्या कलागुणांचा व सामर्थ्याचा विकास करणे इथपर्यंतच राष्ट्रधर्माची मजल जाते; त्यापलीकडे राष्ट्रधर्म उपयुक्त नाही. परिणामी, राष्ट्रधर्मातील (समाजजीवनाची अंगे असलेल्या) कर्मकांड, यज्ञयाग, व्रतविधी इत्यादी गोष्टी तपासल्या जाऊ लागल्या. सामाजिक संघटना, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी बाबींचा विचार हा बहिर्निष्ठ विचार आहे. त्यांच्या साधनेतून व्यक्तीला परम श्रेयस्कर आत्मज्ञान लाभत नाही.

धर्माचे ध्येय मोक्षप्राप्ती हे आहे आणि राष्ट्रधर्मातून हे ध्येय गाठले जाऊ शकत नाही, असे कळू लागत / लागले. त्यातून राष्ट्रधर्मापलीकडे पाहणारा, विश्वातील सर्व मानवांसाठीचा व्यापक विश्व धर्म पुढे येतो व आला. हिंदूत्व, मुसलमानत्व, ख्रिश्चनत्व या साऱ्या गोष्टी मानवकल्पित / मानवनिर्मित आहेत. सर्व मानव समान आहेत आणि परमेश्वर एकच आहे, अशा परमेश्वराची अनेक मार्गांनी भक्ती होऊ शकते, तथापि सर्वोच्च भक्तीप्रकार एकच आहे. त्यालाच विश्वधर्म असे म्हणतात, असे व्यक्तीला उमगू लागले/ते. विश्वव्यापी मानवधर्मात हिदू, ख्रिश्चन, मुस्लीम वगैरे भेद; कर्मकांड, तीर्थक्षेत्रे, मूर्तीपूजा, व्रतवैकल्ये, उपवास वगैरे गोष्टी दुय्यम मानल्या गेल्या / जातात. यापेक्षा अहिंसा, सत्य, प्रेम, आत्मज्ञान यासारख्या चिरंतन मूल्यांच्या साह्याने सदैव सदाचरण करणे व वैयक्तिक जीवनात श्रीज्ञानेश्वर व प्रॉफेट मोहम्मद म्हणतात त्याप्रमाणे परमेश्वराला सदैव स्मरणे, त्याला आळविणे, मी आत्मा असून इतर सर्व माझ्याप्रमाणेच परमेश्वराचे अंश आहेत, असा अनुभव घेण्याचा प्रयत्न करणे, ही विश्वव्यापी मानवधर्माची लक्षणे आहेत.

थोडक्यात, टोळीधर्म, राष्ट्रधर्म व विश्वधर्म या धर्मविकासाच्या वैयक्तिक व सामाजिक अशा तीन अवस्था आहेत. तथापि, अध्यात्मज्ञानी ऋषीमुनींनी, प्रेषितांनी विश्वव्यापी मानवधर्मापलीकडे जाऊन **स्वधर्म** प्रतिपादिला आहे. इस्लाम धर्मातील संपूर्ण शरणागती व हिंदू धर्मातील सायुज्य मुक्ती आणि ख्रिश्चन धर्मातील 'लव्ह दाय नेबर अॅज् दायसेल्फ' ही तत्त्वे स्वधर्माची सूत्रे आहेत. या अर्थाने स्वधर्म हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे, असे सर्व धर्मवाङ्मयात सांगितले आहे.

## ☯ धर्म आणि नीती – संबंध व फरक (Religion & Morality – Relation & Difference): –

धर्माचा नीतिशास्त्राशी अत्यंत निकटचा संबंध आहे. कारण, धर्म व नीती यामध्ये प्राधान्याने मानवी आचाराची मीमांसा येते. धर्मात मुख्यत: आचारविषयक पारलौकिक, ईश्वरविषयक ध्येयांची मीमांसा असते तर नीतीमध्ये आचारसंबंधी नियमांची, तत्त्वांची मीमांसा असते, असे स्थूलमानाने त्यांच्यातील फरकाबाबत म्हणता येईल. तथापि, नीतीच्या प्रेरणा, कार्य, स्वरूप, महत्त्व व मर्यादा यांविषयी जे दृष्टिकोन स्वीकारले जातील त्यावर धर्म व नीती यांच्या संबंधाचे विवेचन व मूल्यमापन अवलंबून राहील.

**नीतीमांसेतील घटक : –**

नीतीशास्त्रीय विवेचनात १) मानवी स्वभावविषयक कल्पना, २) मानवी ध्येये, आदर्श यांविषयीच्या श्रध्दा, ३) योग्य/अयोग्य, चांगले / वाईट वर्तन घडण्यामागील प्रेरणा / कारणे, ४) कृती व वर्तनविषयक **विधी** आणि **निषेध** आणि ५)

विशिष्ट सामाजिक समूहांशी सापेक्ष किंवा सर्व मानवांना समाविष्ट करू शकणारी अशी नैतिक नियमांची प्रणाली, यांचा अंतर्भाव होतो. जगात जे धर्म, पंथ, संप्रदाय निर्माण झाले किंवा धर्म अप्रमाण मानणारे समूह आहेत, त्यांच्या नीतिमीमांसेत या घटकांचा अंतर्भाव झालेला आढळतो.

**नीतीशास्त्राचे कार्य : –**

मानवी आचरणाचे प्रयोजन ठरवणे हे नीतीशास्त्राचे प्राथमिक व प्रधान कार्य आहे. नैतिक कृती या त्या प्रयोजन–संपादनाची साधने आहेत. आरोग्य, सुख, समाजहित, न्याय–प्रस्थापना, ज्ञानवृध्दी, सौंदर्यास्वाद, सत्यसंशोधन, आत्मकल्याण, ईश्वरभक्ती अशी अनेक ध्येये मानवी वर्तनामागे असू शकतात. या ध्येयांची व्यवस्था लावणे म्हणजे त्यांची प्रणाली करणे / मांडणे हे प्रयोजनवादी नीतिशास्त्राचे कार्य होय. दुसऱ्या दृष्टिकोनानुसार कर्तव्य ठरवणे, हे नीतीशास्त्राचे प्रधान कार्य आहे. नैतिक कृतीची युक्तता / अयुक्तता ठरवणे, कर्तव्यनियमांचे प्रामाण्य प्रस्थापित करणे, हे कर्तव्यवादी नीतीशास्त्राला महत्त्वाचे वाटते.

**धर्म : नीतीचे अधिष्ठान –**

अभ्युदय व निःश्रेयस्कर या कल्पनांवर भर देणारी धर्मकल्पना ही प्रयोजनवादी नीतिशास्त्राला जवळची आहे तर धर्मशास्त्रविहित कर्तव्यपालनावर भर देणारी धर्मकल्पना कर्तव्यवादी नीतिशास्त्राला जवळची आहे. प्रत्यक्ष आचरणात प्रयोजन व कर्तव्य या भूमिका अलग राहात नाहीत. कारण, मानव–कल्याण हे प्रयोजन कर्तव्यवादी नीतिशास्त्राला आधारभूत होते तर नैतिक नीतिनियम सुसह्य हवेत, हा नियम प्रयोजनवादास स्वीकारावा लागतो.

प्रत्येक धर्मात आचरणविषयक काही आज्ञा (कमांड्स) असतात. उदा. ख्रिश्चन धर्मातील **दहा आज्ञा**, उपनिषदातील **'सत्यं वद। धर्मं चर।'** हा उपदेश. जैन, बौध्द, इस्लाम इत्यादी धर्मातही धर्माचरण म्हणून काही नियम सांगितलेले आहेत. यातच समूहातील व्यक्तींच्या नैतिक विकासाची व्यवस्था असते. धर्माज्ञांचे पालन जेव्हा व्यक्ती स्वयंप्रेरणेने, आत्मीयतेने करते तेव्हा तिच्या जीवनात धर्मभाव आणि नैतिक विवेक यांचे समन्वयी अधिष्ठान तयार होते.

सर्वसामान्य माणसांच्या जीवनात धार्मिक श्रध्दांचे दडपण त्याला नीतिमान बनविण्यास / राहण्यास कारक ठरते; नीतिमान राहिलो तर स्वर्गसुख व पुनर्जन्मात अधिक समृध्द जीवन लाभेल या अपेक्षेने तो नैतिक मूल्यांचा आदर करतो. पाप–पुण्य, स्वर्ग–नरक याविषयीच्या धार्मिक श्रध्दांमुळे नैतिक जीवनाला धर्माचे नियंत्रक अधिष्ठान लाभत असल्याचे दिसून येते. यामुळे धर्म हा नीतीचा पाया किंवा अधिष्ठान आहे, असे मानले जात होते / आहे. कारण, कोणत्याही प्रकारचे धार्मिक वा आध्यात्मिक अधिष्ठान न स्वीकारता केली जाणारी नीती–मीमांसा अपुरी ठरते. धर्म व नीती यांची पूर्ण फारकत करताच येत नाही. ज्याप्रमाणे नीतिमीमांसा, नैतिक मूल्ये व सद्‌गुण यांचे अधिष्ठान नसलेला धर्म हा धर्म न ठरता अधर्म बनतो, त्याप्रमाणेच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असे विशुध्द धर्मश्रध्दांचे तात्त्विक अधिष्ठान नसल्यास नीतिमीमांसा अपुरी ठरते. म्हणूनच, नीतीची तात्त्विक मीमांसा धर्माचे अधिष्ठान सूचित करते, असे म्हणावे लागेल / लागते.

**ईश्वराच्या अस्तित्वावरील विश्वास हे नीतीचे गृहीत–तत्त्व : –.**

नैतिक मूल्ये व नियम हे केवळ व्यक्तिनिष्ठ वा समूहनिष्ठ राहिले तर नीतीला वास्तविक अधिष्ठान उरणार नाही. विश्वात केवळ कारण–कार्य–संबंधांनी बांधलेली वस्तूंची प्रणाली / व्यवस्था नसून नैतिक मूल्यांची वस्तूनिष्ठ प्रणाली आहे. उदा. ऋग्वेदातील **ऋत–** संकल्पना म्हणजे नैतिक मूल्यांचे वस्तूनिष्ठ व विश्वात्मक अधिष्ठान होय. विश्वातील प्रक्रिया ही अंध, यांत्रिक वा प्रयोजनशून्य नसून विश्व ही सृजनशील, प्रयोजनयुक्त विकासप्रक्रिया आहे, असे अनेक पाश्चिमात्य (उदा. ॲरिस्टॉटल, बर्गसाँ) आणि भारतीय (उदा. श्रीअरविंद) विचारवंतांनी स्पष्ट केले आहे.

नीतीशास्त्रीय समीक्षा तिच्या फलश्रुतीत धर्मशास्त्रात प्रवेश करते. श्रेयस्–कल्पनेचे ('गुड' चे) परिणत सत्ताशास्त्रीय स्वरूप म्हणजे परमेश्वर (गॉड) होय. प्लेटोची अंतिम सत्तेची किंवा परमश्रेष्ठ सद्‌वस्तूची (सुप्रीम रिॲलिटी) कल्पना म्हणजे ज्ञानाचा सर्वश्रेष्ठ विषय होय. नीतीच्या वस्तूनिष्ठतेच्या साह्याने ईश्वराच्या अस्तित्वाविषयीचा विचार रॅशडॉल यांनी मांडला आहे. ते म्हणतात, ''केवलस्वरूप नीतिनियम किंव नैतिक आदर्श जड पदार्थात असणार नाही; तसाच तो या किंवा त्या व्यक्तिगत मनातही असणार नाही. त्याचे प्रामाण्य विश्वात्मक मनाच्या (= देवाच्या) सत्तेवर अवलंबून राहील, नैतिक समीक्षेतील विधानांचा सत्यांश हा विश्वात्मक देवाच्या सत्तेवर आधारित असेल / आहे; विश्व जितके सत्य आहे तितकीच सत्यता नैतिक आदर्शांना आहे, असे त्यावेळीच सयुक्तिकरीत्या म्हणता येईल. ईश्वराच्या अस्तित्वावरील विश्वास हे वस्तूनिष्ठ व केवलस्वरूपी नीतीचे गृहीत–तत्त्व आहे. ज्यामधून सारे विश्व निर्माण होते ते विश्वमन किंवा ईश्वर हेच आपल्या नैतिक आदर्शांचे उगमस्थान आहे.'' कांट यांनी **सद्‌बुध्दी** व कर्तव्याचे **निरूपाधिक आदेश** यांच्या विश्लेषणात १) संकल्पस्वातंत्र्य, २)

आत्म्याचे अमरत्व आणि ३) ईश्वराचे अस्तित्व या तीन नीतीच्या गृहीत–तत्त्वांना (पॉस्च्युलेट्स ऑफ मॉरॅलिटी) मान्यता दिली आहे.

थोडक्यात, विश्वात सामंजस्य आढळते, योजनाबध्दता आढळते, प्रयोजन असल्याचे लक्षात येते. विश्वात्मक प्रयोजन आणि प्रायोजक ईश्वर या त्यामागील सत्ता आहेत. अशा युक्तिवादातून **'नीती ते धर्म'** हा प्रवास स्पष्ट / सूचित होतो. ईश्वराच्या अस्तित्वाशिवाय नैतिक जीवन, नियम, मूल्ये यांची मीमांसा अपुरी ठरते. ईश्वर हा धर्माचा केंद्रबिंदू आहे; ईश्वर हेच मानवाचे परमश्रेष्ठ ध्येय आहे. त्याकडे करावयाचा साचार प्रवास म्हणजे सर्वोत्तम नीती होय. या अर्थाने नीती हे साधन तर धर्म हे साध्य होय; धर्म हा नीतीचा पाया किंवा अधिष्ठान होय.

## ☯ ईश्वराच्या अस्तित्वासाठीचे युक्तिवाद/पुरावे (Arguments/Proofs for the Existence of God) :-

ईश्वर / परमेश्वर / देव आहे काय ? असल्यास कशावरून ? हा धर्माच्या तत्त्वज्ञानातील व धर्मशास्त्रातील अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न जसा ईश्वरावर श्रध्दा असलेल्या विचारवंतांनी केलेला आहे तसाच ईश्वर नाही असे म्हणणाऱ्या विचारवंतांनीही केलेला आहे. यापैकी पहिल्या पकारच्या म्हणजे अस्तिक विचारवंतांनी केलेल्या / मांडलेल्या युक्तिवादांचा (दिलेल्या पुराव्यांचा) विचार इथे करावयाचा आहे.

परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करण्याचा प्रयत्न करणारे प्रमुख चार युक्तिवाद आहेत : –

१. सत्ताशास्त्रीय युक्तिवाद (Ontological Argument),
२. विश्वकारणवादी युक्तिवाद (Cosmological Argument),
३. प्रयोजनवादी युक्तिवाद (Teleological Argument) आणि
४. नैतिक युक्तिवाद (Moral Argument).

या चार युक्तिवादांचा क्रमश: विचार करूयात : –

### १. सत्ताशास्त्रीय युक्तिवाद : –

सेंट ॲन्स्लेम यांनी ईश्वराच्या अस्तित्वाविषयीचा सत्ताशास्त्रीय युक्तिवाद मांडला आहे. त्यांच्या मते, 'ज्याच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ अशी कोणतीही कल्पना नाही, त्या अत्यंत श्रेष्ठ पूर्ण पुरूषाची कल्पना म्हणजे ईश्वर होय.'

ईश्वर–कल्पना ही सर्वश्रेष्ठ पूर्णत्वाची कल्पना असल्याने अस्तित्व हा तिचा अविभाज्य असा आवश्यक व अपरिहार्य घटक ठरतो. 'जे पूर्ण आहे ते नाही' असे म्हणणे स्वविसंगत किंवा आत्मविरोधी ठरते. म्हणून 'सर्वश्रेष्ठ पूर्ण ईश्वराचे अस्तित्व त्याच्या पूर्णत्वातच अंतर्भूत आहे.' थोडक्यात, पूर्ण असलेला ईश्वर हा अस्तित्वात असणारच, असा या युक्तिवादाचा आशय आहे.

देकार्ते या तत्त्वज्ञाने सत्ताशास्त्रीय युक्तिवादाला अधिक चांगले रूप दिले. ते असे : सृष्टीतील प्राणिपदार्थांप्रमाणे परमेश्वर अपूर्ण नसून तो पूर्ण आहे. पूर्णाचा अभाव कल्पिता वा ठरविता येत नाही. पूर्णत्व आणि अस्तित्व ही ईश्वर–कल्पनेची सार–लक्षणे आहेत. उदा. त्रिकोण ही संज्ञा मान्य केली की त्रिकोणाच्या तीन कोनांची बेरीज दोन काटकोनाइतकी (१८०°) असते, हा त्याचा गुणधर्म आवश्यक व अपरिहार्य म्हणून मान्य करावा लागतो. कारण, तो त्रिकोण या संज्ञेतच अंतर्भूत असतो.

**टीका : –**

हा युक्तिवाद आक्षेपार्ह आहे. 'मी आहे' आणि 'मी काळा आहे' ही दोन विधाने व्याकरणदृष्ट्या समान असली तरी अर्थदृष्ट्या समान नाहीत. पहिल्या विधानात 'मी'विषयी काहीही सांगितलेले नाही. म्हणून दुसऱ्या विधानाचा दर्जा पहिल्या विधानाला देता येत नाही. याप्रमाणेच, 'परमेश्वर पूर्ण आहे' या विधानातून परमेश्वराविषयी आणखी काही (म्हणजे उदा. तो काळा, उंच, जाड आहे अशी) माहिती मिळत नाही. म्हणजेच सृष्टीतील इतर पदार्थां**प्रमाणे** किंवा प्राण्यां**प्रमाणे** तो आहे किंवा नाही, असे काहीही म्हणता येत नाही. अर्थात, परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करता येत नाही.

परमेश्वराचे अस्तित्व गृहीत धरल्याने सेंट ॲन्स्लेम यांचा उपरोक्त युक्तिवाद सदोष झालेला / राहिलेला आहे. 'अस्तित्व हे विधेय नाही'; जसे, 'हा शर्ट पांढरा आहे' या विधानातील 'पांढरा' या शब्दाने (विधेयाने) शर्टाविषयी माहिती दिलेली आहे तशी 'देव आहे' या विधानातील 'आहे' या शब्दाने देवाहून वेगळा असा एखादा वा कोणताही गुणधर्म सूचित वा सिध्द होत नाही.

थोडक्यात, पूर्णत्व या कल्पनेत अस्तित्व गृहीत धरल्याने सत्ताशास्त्रीय युक्तिवाद तर्कदोषयुक्त झाला आहे. तथापि, परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करण्यासाठीचा एक प्रामाणिक प्रयत्न म्हणून या युक्तिवादाला मान्यता दिली गेली आहे. सृष्टीतील प्राणिपदार्थांप्रमाणे परमेश्वराचा अनुभव येत नसल्याने वा अनुभव आला तरी तो अचूक शब्दात मांडता नसल्यामुळे सेंट ॲन्स्लेम यांचा हा युक्तिवाद सदोष राहणे अटळ आहे. पूर्णत्व ही कल्पना शब्दांकित करण्याचा कुणाचाही प्रयत्न यशस्वी झाला नाही, होणार नाही.

## २. विश्वकारणवादी युक्तिवाद : –

परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करण्याचा एक जोरकस प्रयत्न म्हणून महत्त्वाचा ठरलेला युक्तिवाद म्हणजे सेंट थॉमस ॲक्वायनस यांनी दिलेला विश्वकारणवादी युक्तिवाद होय. या युक्तिवादाची पुढील चार रूपे आहेत : –

१) विश्वात गती आहे. पदार्थांना गती देणारा पण स्वत: स्थिर असणारा असा कोणीतरी किंवा असे काहीतरी असले पाहिजे. तो किंवा ती किंवा ते म्हणजेच परमेश्वर होय. याअर्थाने, परमेश्वराला **स्थिर चालक** (Unmoved Mover) असे म्हटले जाते.

२) विश्वातील विविध घटनांमध्ये कार्यकारणसंबंध आहे. अगोदर कारण असते व नंतर कार्य घडते. प्रत्येक गोष्टीचे कारण शोधत मागे-मागे गेल्यास **कारणरहित कारणाला** (Uncaused Cause) मान्यता द्यावी लागते. अर्थात, परमेश्वर हा विश्वाचे मूळ (आद्य) कारण होय.

३) विश्वातील काही वस्तू अल्पकाळ टिकणाऱ्या तर काही प्रदीर्घ काळ टिकणाऱ्या असतात. उदा. अन्न व पृथ्वी. परंतू सदासर्वदा असणारी / असणारा कुणीतरी शक्ती किंवा शक्तिमान या अखिल विश्वाची / विश्वाचा साक्षी असली / असला पाहिजे. ही / हा साक्षी म्हणजेच परमेश्वर होय.

४) विश्वातील प्रत्येक गोष्टीला मूल्य असते. स्थलकालपरत्वें ते बदलते, कमीजास्त होते. म्हणून, शिव-अशिव, चांगले-वाईट या सापेक्ष मूल्यांच्या पलीकडे असणारे म्हणजे सदा शिव (The Good) असे काही तरी असले पाहिजे, असे संपूर्णत: सुसंगत व प्रामाणिक विचार करणाराला वाटते. **निरपेक्ष चांगले** (Absolutely Good) म्हणजे परमेश्वर होय. त्यालाच **चिरंतन मूल्य** असे म्हणतात. हे सांगण्यासाठीच **सत्यं शिवं** व **सुंदरं** या तीन शब्दांची योजना केली गेली आहे.

**परीक्षण : –**

ॲक्वायनस यांनी मांडलेला हा युक्तिवाद सकृद्दर्शनी पटणारा वाटतो. तथापि, या युक्तिवादाचे उपरोक्त सर्व प्रकार तर्कदुष्ट (तर्कदोषयुक्त) आहेत. स्वत: स्थिर असलेला पण विश्वातील लहानथोर वस्तूंना, प्राण्यांना गतिमान करणारा व ठेवणारा म्हणजे ईश्वर, ही कल्पना मानवी बुध्दीच्या आकलनशक्तीच्या पलीकडची आहे. कारण, तो ईश्वर प्राणिपदार्थांसारखा नाही की ज्याचेबाबत विचार करणे शक्य व्हावे / होते. वस्तू व प्राणी क्षणिक म्हणजे काही काळ टिकणारे असतात. कारण त्यांच्यावर वातावरणाचा परिणाम होत असतो; त्या निसर्गनियमांनी प्रभावित (परिणाम होणाऱ्या) व बध्द होणाऱ्या असतात. याउलट ज्याला निसर्गनियम लागू नाहीत, असा पदार्थ, सद्‌वस्तू (Substance) म्हणजे परमेश्वर (Supernatural Being) ही कल्पना मात्र न समजणारी आहे. अर्थात, मानवी बुध्दीला ज्याप्रकारचे स्पष्टीकरण हवे असते ते सेंट ॲक्वायनस यांनी परमेश्वराच्या अस्तित्वाबाबत दिलेले नाही. विश्वाचे कारण असूनही स्वत: कारणरहित असलेल्या अशा परमेश्वराची कल्पना करणे किंवा त्यासाठी शब्द जोडणे शक्य असले तरी त्या शब्दांचे आकलन करणे कुणालाही व कदापिही शक्य नाही. कदाचित, विश्वातील प्राणिपदार्थ निर्माण होणे व नाहीसे होणे हे असेच अविरत चालू राहील, हे तत्त्व मानता येते; त्यासाठी परमेश्वर मानण्याची गरज नाही. जर वस्तूंच्या निर्मितीमागे विशिष्ट हेतू म्हणजे कारण असेल तर जीवनात दु:ख निर्माण करण्याचा हेतू काय, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळत नाही. याशिवाय अतिक्षुद्र जीवजंतु कशासाठी निर्माण केलेत, याचेही उत्तर मिळत नाही.

**टीकेला उत्तर : –**

वरील परीक्षणात्मक टीकेचा संशयवादी रोख लक्षात घेऊनही विश्वकारणवादी युक्तिवाद तग धरतो. कारण, विश्वातील घटनांचे स्पष्टीकरण देणे ही मानवी बुध्दीची भूक (गरज) आहे. जर घटनांचा प्रवाह अनंत काळ असाच चालूच राहणार आहे, असे मानले तर मानवी वर्तनाला किंवा एखाद्या घटनेला चांगले वा वाईट, योग्य वा अयोग्य म्हणताच येणार नाही. उदा. वस्तू वा प्राणी कालांतराने नाहीसे होतातच; मग एखाद्याने स्वार्थासाठी काहींचा नाश केला तर बिघडते कुठे ? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देण्यासाठी परमेश्वर व त्याचे विश्वावरील नियंत्रण या गोष्टी गृहीत धराव्या लागतात, मान्य कराव्या लागतात.

## ३. प्रयोजनवादी युक्तिवाद : –

परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी विल्यम पॅले यांनी प्रयोजनवादी युक्तिवाद मांडला आहे. सृष्टीमध्ये प्रयोजकता आढळते, उद्देश आढळतो, रचनात्मक व्यवस्था जाणवते, प्राणिपदार्थ टिकून राहण्यासाठीची व मानवी कल्याणाची दृष्टी असल्याचे दिसते. ही रचना / व्यवस्था केवळ यादृच्छिक (Accidental) आहे, असे मानता येत नाही. तिच्यामागे कोणी निर्माता, शासक असला पाहिजे. परमेश्वर हा या चेतन-अचेतन सृष्टीचा किंवा विश्वव्यवस्थेचा निर्माता व रचनाकार (रचयिता) होय.

विल्यम पॅले यांनी आपला युक्तिवाद एका सादृश्यानुमानाच्या (Analogy) आधारे स्पष्ट केला आहे. त्यांनी त्यासाठी घडङ्माळाचे उदाहरण घेतले आहे. ते म्हणतात, ''घड्याळाची रचना गुंतागुंतीची असते. त्यातील चक्रे, काटे वगैरेंचे एकमेकांशी कार्यात्मक संबंध असतात. त्यामुळे त्यातील काटे पाहून आपण वेळ मोजू / सांगू शकतो. घड्याळातील ते घटक धातूंचे असल्यामुळे ते स्वत: काहीच करत नाहीत तर त्यांना तयार करणारा, कार्याला जुंपणारा कुणीतरी बुध्दिमान प्राणी असला पाहिजे. तो जसा माणूस तसा सृष्टी चालविणारा बुध्दिमान कर्ता म्हणजे परमेश्वर होय.''

घड्याळ व विश्व यातील सादृश्याचा/ साम्याचा त्यांनी चिकित्सक विचार केला आहे.

**चिकित्सक विचार : –**

१. घड्याळ मानवनिर्मित आहे. तथापि ज्याला ते मानवनिर्मित आहे असे माहीत नाही त्याला देखील ही वस्तू कोणीतरी निर्माण केली असली पाहिजे, असा विचार सुचतो. त्या विचारापासून तो बुध्दी असलेल्या माणसाप्रत येऊन पोचतो. म्हणजे कोणी मानवाने घड्याळ निर्माण केले आहे, असा निष्कर्ष तो काढतो. त्याचप्रमाणे सृष्टीचे निरीक्षण केल्यास सृष्टीचक्र फिरविणारा प्रत्यक्ष दिसत नसला तरी तो असला पाहिजे, असा विचार निर्माण होतो / येतो. सृष्टीचक्र फिरविणारा तो जो कुणी तो परमेश्वर होय. घड्याळाचे कार्य काही वेळा अचूक चालत नसते तसे सृष्टीतही काही वेळा अनाकलनीय स्थिती निर्माण झाल्याचे दिसते. जर घड्याळ निर्माण करणारा व सृष्टी निर्माण करणारा बुध्दिमान असेल तर तो असे का निर्माण होऊ देतो, असा प्रश्न निर्माण उद्भवतो / पडतो. हा प्रश्नात्मक युक्तिवाद सुरुवातीला योग्य वाटत असला तरी सूक्ष्म विचारांतीं तो खंडित होतो. कारण, घड्याळ जसे दुरूस्त होऊ शकते तसे निसर्गातील प्रपातही (आकस्मिक घटनाही) नंतर नाहीसे (नाहीशा) होतात. या दोन्हींमागे कोणीतरी बुध्दिमान कारागीर असला पाहिजे, असे वाटत राहते.

२. घड्याळातील काही भागांचे आपल्याला महत्त्व वाटत नाही, तसेच काही भाग कशासाठी आहेत ते कळत नाही त्याचप्रमाणे सृष्टीतील अनेक घटकांच्या मागे असलेले प्रयोजन आपल्याला समजत नाही. म्हणून प्रयोजनच नाही, असे म्हणता येत नाही. कारण, अधिकाधिक सुसंगत विचार केल्यास सृष्टी सुसंगत व सुव्यवस्थित असल्याचेच निदर्शनास येते. निसर्ग म्हणजे अतिशय गुंतागुंतीची एक यंत्रणा आहे. अनेक ग्रह–तारे फिरत आहेत, ऋतू बदलत आहेत, जड व सजीव सृष्टी एकमेकांवर परिणाम करीत आहे, हे आपल्याला आपल्या शरीराच्या ठिकाणीही जाणवते. याचा सूक्ष्म विचार केल्यास त्यामागे विशिष्ट हेतू असावा व तो कुणाचा तरी असावा, असे वाटू व पटू लागते. (हे सूचविण्यासाठीच उदा. समर्थ रामदासांनी **'मनुष्यासारिखे यंत्र नाही**' असे विधान केले आहे.) मानवी मेंदू म्हणजे कोट्यवधी सूक्ष्म पेशींचे संयुक्त भांडार आहे, मेंदूच्या विशिष्ट भागांना विशिष्ट कामे दिली आहेत, शरीररचनेतही आवश्यकतेनुसार फरक आहेत. उदा. दंडाचे स्नायू, पोटाचे स्नायू यांच्यात फरक आहे. मानवप्राण्यांना बुध्दी आहे तर पशुपक्षी सहजप्रवृत्तीनुसार वागतात. पृथ्वीभोवती ओझोन नावाचा संरक्षक वायू आहे. त्यातून अतिनील किरण गाळून येतात म्हणून पृथ्वी टिकून राहते. जर हे किरण जसेच्या तसे पृथ्वीवर आले तर पृथ्वी जळून भस्म होईल. म्हणून पृथ्वीभोवती ओझोनचा थर निर्माण करणारा कुणीतरी असला पाहिजे, असे अनुमान करण्याकडे बुध्दी होते. हा कुणीतरी म्हणजेच परमेश्वर होय.

थोडक्यात, सृष्टीतील व्यवस्थेमागे काही तरी हेतू (प्रयोजन) आहे आणि तो / ते कुणाच्यातरी मनात आहे, असे मानल्याशिवाय सृष्टीचे स्पष्टीकरण देता / करता येत नाही, असा विल्यम पॅले यांचा युक्तिवाद आहे.

**डेव्हिड ह्यूम यांनी या युक्तिवादावर केलेली टीका : –**

डेव्हिड ह्यूम यांनी हा प्रयोजनवादी युक्तिवाद तपासला आहे. ते म्हणतात, ''विश्व राहण्यासाठी व्यवस्थित असलेच पाहिजे. ज्याचे घटक एकमेकांशी सुव्यवस्थितपणे जोडलेले नाहीत असे विश्व असूच शकत नाही. परमेश्वराने अगोदर पृथ्वीवर प्राणी निर्माण केले पण अतिनील किरणांनी त्यांना नष्ट केले; म्हणून **मग / नंतर** परमेश्वराने पृथ्वीभोवती ओझोनचा थर निर्माण केला, हे म्हणणे हास्यास्पद आहे.'' ते पुढे म्हणतात, ''घड्याळ व निसर्ग यातील सादृश्य अतिशय कनिष्ट प्रकारचे आहे. विश्व अतिमहान व विस्तृत आहे. त्याची तुलना प्राण्यांशी किंवा घड्याळाशी करणे विचित्र वाटते. एवढ्या मोठ्या विश्वामागे एखाद्या कारागिराचा हेतू व हात आहे, हे समजून घेणे कठीण आहे. सृष्टीतील पदार्थ छोटे आहेत. तुलनेने काही मोठे आहेत. या सर्वांना निर्माण करणारा परमेश्वर मात्र एकच आहे, हे म्हणणे देखील अनाकलनीय आहे. सृष्टीत अनेक भू–गोल आहेत. कदाचित त्यांना निर्माण करणारे अनेक देव असतील. म्हणून, परमेश्वर म्हणून कुणी एक आहे, या म्हणण्याला अर्थ उरत नाही.''

**डेव्हिड ह्यूम यांनी केलेल्या या टीकेला उत्तर : –**

ह्यूम यांची ही टीका प्रयोजनवादी युक्तिवाद शुध्द करण्यासाठी व सिध्दही करण्यासाठी उपयुक्त आहे. सृष्टीमागे कुणाचाही हात नाही, असे मानणे म्हणजे माणसाच्या जीवनामागे काहीही हेतू नाही, त्याची सारी धडपड बुध्दीयुक्त नाही, असे मानणे होय. परिणामी, म्हणजे असे मानले तर, सारे जीवन निरर्थक ठरते. **याउलट,** परमेश्वर सर्वशक्तिमान आहे, त्याला

विविध प्राणी, पदार्थ निर्माण करण्यासाठी काळाचे, वेळेचे बंधन नाही, त्याने चुकत–माकत विश्व निर्माण केलेले नाही. यातच पूर्वनियोजनाची कल्पना अंतर्भूत आहे. विश्वाची रचना अनाकलनीय आहे, हे सत्य आहे; पण, थोड्या प्रमाणात का होईना, सृष्टीतील घटनांचा व घटकांचा आपण क्रमवार व सुसंगत अर्थ लावू शकतो व त्याआधारे सृष्टीकर्त्याची कल्पना करू शकतो, त्याचे स्वरूप समजून घेऊ शकतो.

सारांश, प्रयोजनवादी युक्तिवाद देखील अनुमानात्मक आहे; परमेश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा नव्हे.

## ४. नैतिक युक्तिवाद : –

परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी केलेल्या उपरोक्त तिन्ही युक्तिवादांचा आशय समजून घेताना ते कसे सदोष वा तर्कदोषयुक्त वा अपुरे आहेत ते आपण पाहिले. परिणामी ईश्वराचे अस्तित्व हा जणू काय एक **अंध विश्वासच** (Blind Faith) आहे, असे वाटू लागते.

तथापि, विवेकशीलतेवर आधारित अशा या युक्तिवादांना (Rational Demonstration) दूर सारीत कांटने देवाचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी निर्णायक युक्तिवाद (Conclusive Argument) प्रस्तुत केला आहे. मानवी मनाला शक्य असलेला एकमेव निर्णायक युक्तिवाद म्हणजे नैतिक युक्तिवाद होय, असा दावा कांटने केला आहे. म्हणून या युक्तिवादास **कांटियन ऑर्ग्युमेंट** म्हणूनही ओळखले जाते. नैतिक युक्तिवाद हे शब्दच त्याच्या आशयाचे सूचक आहेत.

**नैतिक युक्तिवादाचा आशय : –**

नैतिक युक्तिवादाचा आशय थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे : ''समाजातील नैतिक मूल्ये हे एक वास्तव असते कारण, नैतिक मूल्ये ही विश्वातच असलेल्या माणसांच्या मनात वास करीत असतात. आपण माणूस म्हणून जसे खरे आहोत तशीच मूल्येही खरी आहेत, हे माणूस नाकारू शकत नाही. माणूस व मूल्ये खरी नसती तर आपल्या मनातील मूल्यांचे स्पष्टीकरण व समर्थन माणूस करू शकलाच नसता. याशिवाय, जर कुणी विचारशील शक्ती (की जिला जगाच्या कल्याणाची काळजी आहे) हे विश्व नियंत्रित करीत नसती तर विश्वात नैतिकता असू तरी शकली असती का?'' अर्थातच नसती. म्हणूनच जगात ज्याअर्थी नैतिक मूल्ये आहेत त्याअर्थी (त्यावरून) ती अबाधित ठेवणारा देवही (कुठल्यातरी रूपात) अस्तित्वात असलाच पाहिजे, असे कांटचे प्रतिपादन आहे. **ईश्वर हे शिवम्‌चे पूर्वगृहीतक आहे** (Good presupposes God.), हे अतिशय अर्थपूर्ण / समर्पक विधान त्याने सदर युक्तिवादाचा निष्कर्ष म्हणून केले आहे.

**नैतिक युक्तिवादाचे महत्त्व : –**

१. देवाचे अस्तित्व सिध्द करण्याचा दावा करणाऱ्या युक्तिवादातील सर्वात समर्थ असा युक्तिवाद म्हणजे नैतिक युक्तिवाद होय. कारण, आपण अगोदर अभ्यासिलेले तिन्ही युक्तिवाद देवाचे अस्तित्व नि:संशयपणे / नि:शंकपणे सिध्द करू शकत नाहीत. ते समजून घेताना आपल्या मनात काही ना काही शंका राहून जातात. शिवाय, काही विचारवंतांच्या मते, ते सारे युक्तिवाद अनावश्यकही आहेत. नैतिक युक्तिवादरूपी भक्कम पायावर धर्मविचाररूपी इमारत मात्र उभी राहू शकते / उभी आहे.

२. आधुनिक धर्मशास्त्रानुसार (Theology) देव जर जगातील चांगुलपणाचा समर्थक, आधार नसेल तर तो काही कामाचाच नव्हे. आधुनिक विज्ञानाने तर एवढी प्रगती केली आहे, की त्यामुळे देव आहे, असे मानणेच मोठे कठीण होऊन बसले आहे. तथापि, चांगुलपणाचा आधार म्हणून देव मानण्यास आधुनिक विज्ञानही विरोध करू शकत नाही. कारण, नैतिक युक्तिवादानुसार आपल्याला तथाकथित सर्वज्ञ, सर्वशक्तिमान अशा देवाची निकड (गरज) नसून नैतिक आचरण करणाऱ्या माणसाला दिलासा देणाऱ्या देवाची गरज आहे.

३. सदाचरणी माणसास जे समाधान वाटत असते / हवे असते त्यावरून 'नीतीमत्तेचा समर्थक' असलेल्या देवावरील विश्वासाचे समर्थन करता येते. नैतिक मूल्यांची परिपूर्णता, सद्‌गुणांची परिपूर्णता किंवा मूर्तिमंत सद्‌गुण म्हणून देवाची कल्पना आपल्यासमोर येते. मानवी जीवनातील न्याय, सत्य, प्रेम, शहाणपण, चांगुलपण इत्यादी मूल्ये मानवी मनातील देवत्वाकडे बोट करतात. अर्थात, या मूल्यांच्या रूपाने देव माणसाच्या अंत:करणात राहत असतो. प्रेमाची मूर्ती, न्यायमूर्ती म्हणून आपण देवाकडे पाहू शकतो. याअर्थाने देव व चांगुलपण यातील घनिष्ट संबंधाकडे आपण अर्थपूर्ण दृष्टीने पाहू शकतो. अशा देवावर आपण प्रेम करू शकतो, अशा देवाची आपण सेवा करू शकतो, अशा देवास आपण प्रार्थना करू शकतो.

## ☯ धर्मनिरपेक्षता व धर्मनिरपेक्ष राज्य – संकल्पना (Concept of Secularism & Secular State) :–

**प्रास्ताविक : –**

धर्म हे भारतातील लोकांच्या जीवनाचे एक प्रमुख अंग आहे. पृथ्वीच्या पाठीवरील निरनिराळ्या देशात ज्या संस्कृती होऊन गेल्या त्यापैकी बहुतेक संस्कृतींना धर्माचे अधिष्ठान होते / आहे.

दृश्य सृष्टीतील गूढ व अदृश्य शक्तीशी / शक्तींशी संबंध साधता येतो आणि त्यातून आपले कल्याण करून घेता येते, या धर्मश्रध्देतून आचरण करणे म्हणजे धर्माचरण करणे होय. परमेश्वराला किंवा चैतन्य शक्तीला प्रसन्न करून घेण्यासाठी / ठेवण्यासाठी प्रत्येक धर्माने कर्मकांड, उपासना–पध्दती, तत्त्वज्ञान, नीतीविचार आपापल्या जनतेसमोर ठेवले आहेत. त्यामळेच धर्माधर्मात भेद निर्माण झाले आहेत / होतात. भारतात अनेक धर्माचे लोक राहतात. म्हणून भारताने धर्मनिरपेक्ष शासन व जीवनपध्दती स्वीकारली आहे

**धर्मनिरपेक्ष लोकशाही व धर्मनिरपेक्ष शासनाची संकल्पना : –**

सर्व धर्मांच्या नागरिकांना धार्मिक आचार, विचार, उपासना यांची स्वतंत्रता, सामाजिक व्यवहारावर शासनाचे नियंत्रण आणि सर्व धर्मांच्या लोकांना समान सामाजिक व राजकीय हक्क ही धर्मनिरपेक्ष लोकशाहीची लक्षणे मानली जातात. धर्मनिरपेक्ष शासनात पुढील तीन प्रमुख संकल्पनांचा सुस्पष्टपणे समावेश केलेला आहे :

१. राष्ट्राचे नागरिकत्व सर्व धर्मांच्या व / वा पंथांच्या लोकांना खुले राहील. त्यासाठी कोणत्याही एका धर्मावर श्रध्दा असण्याची गरज नाही. धर्म मानणाऱ्या नागरिकांप्रमाणे धर्म न मानणाऱ्यांनाही नागरिकत्वाचे सर्व अधिकार मिळतील, असतील, राहतील. त्यांच्यामध्ये कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

२. प्रत्येक व्यक्तीला श्रध्दा, विचार व आचार यांचे स्वातंत्र्य राहील. शासन कोणाच्याही धर्मात ढवळाढवळ करणार नाही.

३. धर्म व शासन यांचे प्रांत वेगवेगळे राहतील. धर्म ही प्रत्येक व्यक्तीची खाजगी बाब राहील; तर सामाजिक व्यवहाराचे नियम ठरविणे व त्यांची अंमलबजावणी करणे, हे शासनाचे प्रमुख काम असेल. ते करताना जर धर्माशी / धर्मांशी संबंध आला तर अंतिम निर्णय करण्याचा / घेण्याचा अधिकार शासनाचाच राहील.

**धर्मनिरपेक्षता व सर्वधर्मसमभाव : –**

धर्मनिरपेक्षता व सर्वधर्मसमभाव या दोन संकल्पनांची नेहमीच गल्लत केली जाते. महात्मा गांधींनी सर्वप्रथम सर्वधर्मसमभाव या तत्त्वाचा पुरस्कार केला; परंतु त्यांची गल्लत त्यांनी केली नाही. त्यांनी धर्मनिपरपेक्ष शासन व सर्व धर्मांच्या लोकांची समानता या मुद्द्यांचा पाठपुरावा केला आहे. गांधी स्वत:ला हिंदू म्हणवून घेत असले तरी त्यांचा धर्म हा ‘विश्वव्यापी मानवधर्म’ होता. नीतीमार्गाकडे प्रवृत्त करणे, माणसाच्या मनातील व समाजातील दुरिताविरुध्द त्याला मानसिक आधार देणे, हे धर्माचे कार्य आहे. कोणत्याही धर्माच्या मंदिराचा जीर्णोध्दार करावयाचा असेल तर ते काम त्या धर्माच्या लोकांनी पार पाडावे; शासनान त्या कामात पुढाकार घेऊ नये, शासकीय पैशाचा वापर त्यासाठी करू नये. शासकीय अनुदान मिळत असलेल्या शाळांतून विशिष्ट धर्मशिक्षणावर भर देऊ नये. अशाप्रकारे, सर्वधर्मसमभाव हे, गांधीजींच्या मते, शासकीय व्यवहाराचे तत्त्व नसून लोकांनी परस्परांशी व्यवहार करताना पाळावयाची ती सामाजिक नीती आहे.

**धर्मनिरपेक्ष शासन / राज्य (भारतीय संदर्भ) : –**

भारतीय संविधानात धर्मनिरपेक्ष शासनाची पुढील अंगे समाविष्ट करण्यात आली आहेत –

१. परमेश्वर एक आहे,

२. धर्म सर्व मानवांसाठी आहे आणि

३. धर्म सुधारणाक्षम असतो.

भारतीय राज्यघटनेच्या २५ व्या कलमानुसार भारतातील सर्व लोकांना धार्मिक स्वातंत्र्य, विचार, आचार व प्रचार यांचे स्वातंत्र्य आहे; मात्र शांतता व सुव्यवस्था, आरोग्य व नीतीमत्ता यांच्या संरक्षणासाठी धार्मिक स्वातंत्र्याला मर्यादा घालण्याचा अधिकार घटनेने सरकारला दिला आहे. आपल्याकडे (भारतात) हिंदू व मुस्लीम जमातीत रस्त्यावरून धार्मिक मिरवणूक वाजत–गाजत नेण्याची पध्दत आहे. प्रसंगी वाद होतात व त्यांचे पर्यवसान जातीय दंगलीत होते. म्हणून अशा मिरवणुकांचे नियंत्रण करण्याचा अधिकार शासनाला देणे भाग पडले व पडते.

व्यक्तीप्रमाणे समुदायालाही घटनेने धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. कायदा व सुव्यवस्था यांच्यासारख्या निर्बंधांच्या चौकटीत राहून धार्मिक व धर्मादाय कारणांसाठी संस्था काढण्याचा, त्या चालविण्याचा, धार्मिक व्यवहारातील स्वायत्ततेचा, स्थावर–जंगम मालमत्तेची मालकी असण्याचा, ती संपादन करण्याचा व कायद्याला अनुसरून तिची विल्हेवाट लावण्याचा हक्क घटनेने मान्य केला आहे. धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे व चालविण्याचे अधिकार आहेत. शासकीय अनुदान देताना अल्पसंख्याकांनी चासविलेल्या शिक्षणसंस्थांविरुध्द पक्षपात करता येणार नाही, असे आश्वासनही घटनेने दिले आहे.

भारतीय संविधानाने सर्व धर्मांच्या व पंथांच्या स्त्रीपुरूषांना नागरिकत्वाचे समान हक्क दिले आहेत. धर्म, वंश, जात, लिंग, व जन्मस्थळ यांची कसोटी लावून नागरिकांमध्ये शासनाला कोणताही भेदाभेद करता येणार नाही. परंतू, त्याचबरोबर जे सामाजिक व सांस्कृतिक दृष्टञ्ज्ञा मागासलेले आहेत अशा नागरिकांसाठी, विशेषत: अनुसूचित जातीजमातींच्या उन्नतीसाठी कायद्याने विशेष तरतूदी करण्याचा अधिकार घटनेने दिला आहे. धर्मनिरपेक्षतेत धर्मांतराचे स्वातंत्र्यही दिले आहे आणि ते अबाधित ठेवण्यासाठी शासनाने व्यक्तीला संरक्षणही द्यावयाचे आहे.

## ☯ मूलतत्त्ववाद व त्यामुळे निर्माण झालेल्या समस्या : –

**मूलतत्त्ववाद म्हणजे काय ?**

मूलतत्त्ववाद म्हणजे एखाद्या विशिष्ट अशा धर्माने सांगितलेल्या मूलभूत तत्त्वांच्या अनुषंगाने समाजाची रचना करण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या मंडळींची विचारसरणी होय. वाद म्हणजे विचारसरणी व मूलतत्त्ववाद म्हणजे मूलतत्त्वांची विचारसरणी. संबंधित धर्माची मूलतत्त्वे प्रत्यक्ष आचरणात यावी यासाठी सातत्याने जी विचारसरणी (म्हणजे त्या विचारसरणीचे लोक) प्रयत्न करीत असते (असतात) तिला मूलतत्त्ववाद म्हटले जाते. या अर्थाने मूलतत्त्ववादाची व्याख्या सर्वच धर्मांध मंडळींना सामावून घेत असते. पण त्याचवेळी प्रत्येक धर्माशी संबंधित मूलतत्त्ववादञ्चांचा तपशील मात्र वेगवेगळा असतो.

**मूलतत्त्ववाद ही संपूर्ण जीवनाला व्यापणारी विचारसरणी : –**

मूलतत्त्ववादञ्चांचा संबंध हा धर्माशिवाय जीवनाची जी इतर क्षेत्रे आहेत त्यातदेखील प्राचीनांच्या आदर्शांचा आग्रह धरण्याशी असतो. ज्या गोष्टी रूढ झाल्या आहेत त्या 'शाश्वत' मानणे, धर्म, राजकारण, नैतिक मूल्ये, कर्मकांड, समाजव्यवस्था, वेशभूषा, केशभूषा, खान–पान एवढेच नव्हे तर औषधोपचारांच्या पध्दती या सर्वांबद्दल पूर्वीपासून ज्या मान्यता आहेत त्या आताही जशाच्या तशा स्वीकाराव्यात म्हणून विविध प्रकारच्या धार्मिक, सांप्रदायिक संघटना, संस्था, सभा, व्याख्याने, लेख, परिसंवाद, शिबिरे इत्यादींमार्फत ते प्राचीनांचे आदर्श समाजाचे गळीं उतरविण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतात / राहतात. उदा. समाजव्यवस्थेच्या संदर्भात वर्णव्यवस्थेचे समर्थन, अर्थव्यवस्थेच्या संदर्भात यंत्रसंस्कृतीचा/ला विरोध आणि जुन्या उत्पादनपध्दतीचा आग्रह इत्यादी. यावरून मूलतत्त्ववाद हा केवळ धर्म, धर्मश्रध्दा आणि धर्मग्रंथात सांगितलेल्या समाजव्यवस्थेच्या संदर्भातीलच विचारसरणी नसून ती संपूर्ण जीवनाला व्यापणारी विचारसरणी आहे. जेव्हा तिला सत्तेची आणि शास्त्राची जोड मिळते त्यावेळी मात्र त्या संपूर्ण समाजव्यवस्थेसमोर अनेक आव्हाने उभी राहतात.

**मूलतत्त्ववादामुळे समाजात समस्या निर्माण होण्याचे कारण : –**

मानवी जीवनात धर्माचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वैयक्तिक पातळीवर मनाची एक गरज म्हणून धर्माची भूमिका वादातीत आहे. प्रत्येक धर्मसंस्थापकाने धर्माची मांडणी करीत असताना **माणूस** हा केंद्रबिंदू मानलेला आहे. पण त्याचबरोबर संवेदनक्षम, नैतिक आणि आपल्यापलीकडे जाऊन इतरांच्या सुखदु:खाबद्दल विचार करणारी माणसे वाढली पाहिजेत अशी धडपड देखील त्यांनी केलेली दिसून येते. आजचे मूलतत्त्ववादी सोयीस्करपणे हे विसरतात. धर्मसंस्थापक हे त्यंच्याकाळी प्रचलित असलेल्या समाजव्यवस्थेच्या विरुध्द बंड करून उभे होते. याउलट मूलतत्त्ववादी

धर्मसंस्थापकाने सांगितलेली व्यवस्था शाश्वत, आदर्श, अपरिवर्तनीय व महान आहे असे गृहीत धरून तिच्या पुनर्स्थापनेचे प्रयत्न करतात आणि त्यामुळेच अनेक समस्या निर्माण होतात.

**मूलतत्त्ववादी व राजकारणी लोकांना धर्मांधतेकडे नेतात : –**

मूलतत्त्ववादञ्चांची एक महत्त्वाची मांडणी अशी असते, की आजच्या काळात जी अनैतिकता, शोषण, अन्याय आणि इतर वाईट गोष्टी वाढत आहेत त्यांना कारणीभूत एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे आजचा समाज धर्मग्रंथात सांगितलेल्या व्यवस्थेपासून दूर गेला, ही होय. जर **सुजलाम् सुफलाम्** हवा असेल, सर्वांना न्याय हवा असेल तर धर्मग्रंथात वर्णिलेली व्यवस्था साकार करण्याची गरज आहे. अर्थात, मूलतत्त्ववादी लोक लोकांना पुन: धर्मांधतेकडे नेण्याचा प्रयत्न करतात. जोपर्यंत सत्ता हातात येत नाही तोपर्यंत आपण जुनी व्यवस्था आणू शकत नाही हे ते जाणतात. म्हणून वर्तमान काळातील लोकांचे मूलभूत प्रश्न घेऊन सत्ता हातात घेण्याचा ते प्रयत्न करतात. त्यामुळे मूलतत्त्ववादी व राजकारणी महत्त्वाकांक्षी एकत्र येतात; धर्मपंडिताप्रमाणे राजकारणीही धर्माबरहुकूम व्यवस्थेचा आग्रह धरू लागतात. पण, ज्या सामान्य माणसाच्या सुखासाठी म्हणून हे सर्व घडत असते तो माणूस मात्र मूलतत्त्ववादी नसतो की राजकारणीही नसतो. तो भाबडेपणाने यांच्याकडे आकर्षिला जातो आणि खूपच उशीरा या सत्तालोलुप लोकांचे स्वरूप त्याला समजते; परंतू तोपर्यंत त्याने खूप मोठी किंमत मोजलेली असते, खूप काही उद्‌ध्वस्त झालेले असते.

**मूलतत्त्ववाद लोकशाहीशी विसंगत असतो : –**

मूलतत्त्ववादी हे मूळात संकुचित मनोवृत्तीचे, अहंकारी, क्रूर व इतर धर्मीयांकडे तुच्छतेने पाहणारे असतात. स्वत:च्या धर्मातील सर्वांच्याकडे देखील ते माणुसकीने पाहत नसतात; तर एका विशिष्ट वर्गाचे हितसंबंध जोपासण्यातच त्यांना आनंद मिळत असतो. धर्मक्षेत्रातील ते हुकूमशहाच असतात. आम्ही सर्वश्रेष्ठ आहोत, इतर आमचे गुलाम आहेत किंवा आम्ही जे सांगू, जे नियम करू त्याप्रमाणे प्रत्येकाने वागले पाहिजे, हा त्यांचा (लोकशाही जीवनप्रणालीशी पूर्णत: विसंगत असणारा) कायमचा आग्रह असतो.

मूलतत्त्ववादी माणसाच्या स्वातंत्र्यास पूर्णपणे नाकारतात. त्यांच्या निर्णयस्वातंत्र्यास देखील नाकारतात. समाजातील मूठभरांनाच ते हे स्वातंत्र्य देतात. अर्थात, मूलभूत हक्कांना पासदळी तुडवून मूलतत्त्ववाद पोसला जाऊ शकतो हे अमानवी धोरण मूलतत्त्ववादी उरीं बाळगून असतात.

**मूलतत्त्ववादी व सत्तांध लोक जनतेचे शोषण करतात : –**

मूलतत्त्ववाद आणि सत्ता हे दोघेही ज्यावेळी हातात हात घालून प्रवास करू लागतात किंवा राजसत्तेवर मूलतत्त्ववादी आपले वर्चस्व सिध्द करतात, त्यावेळी अन्याय, अत्याचार, शोषण, स्त्रियांकडे केवळ भोगवस्तू म्हणून पाहण्याची दृष्टी, इत्यादी असामाजिक प्रवृत्तींचा नंगा नाच सुरू होतो. या प्रक्रियेत सर्वात जास्त पोळली जाते ती स्त्री आणि तेथील श्रमिक जनता. काही मूठभरांच्या सेवेसाठी सगळी यंत्रणा काम करू लागते. हे असे कित्येक वर्षे पाकिस्तानात, बांगला देशात चालत होते, आजही इस्लामी राष्ट्रात चालू आहे. युरोपमध्ये १६व्या, १७व्या शतकात पोप आणि ख्रिश्चन धर्मगुरूंनी असाच उच्छाद मांडला होता. आपल्याकडे इतिहासकाळात दलित आणि स्त्रियांवर अनन्वित अत्याचार झालेले आहेत. अर्थात, मूलतत्त्ववादी विचार व आचारसरणीमुळे सर्वसामान्य जनतेवर अन्यायच झाला आहे, तिचे शोषणच झाले आहे. आपल्याकडे इतिहासकाळात दलित आणि स्त्रियांवर गेल्या १०–१५ वर्षांपासून मूलतत्त्ववाद आपल्या देशात पुन: सक्रिय होत आहे. धर्मनिरपेक्षतेला, सर्वधर्मसमभावाला तडे बसत आहेत. अर्थात, इतर धर्मियांबाबत संशयी वातावरण निर्माण करून ते पोसले जाईल असे प्रयत्न मूलतत्त्ववादी संघटना करीत आहेत. देशात सर्व धर्मांचे लोक नागरिक म्हणून राहत असताना व आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व धर्मीय लोक एकत्र जगू लागलेले असताना, विशिष्ट धर्माचे राष्ट्र निर्माण करण्याची कल्पना बाळगून त्याप्रमाणे समाजात बदल घडवून आणण्याचे पध्दतशीर प्रयत्न होत आहेत. त्यामुळे धार्मिक तंटे, भेदभाव, बेबनाव वाढण्याची शक्यता निर्माण होत आहे.

**मूलतत्त्ववादाविरुध्द उपाय : –**

मूलतत्त्ववादावरील व त्याच्या परिणामांविरुध्द एकमेव उपाय म्हणजे धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभावाचे तत्त्व व त्यानुसार सर्व नागरिकांना जगता येणे म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही मूल्ये दैनंदिन जीचनात अखंडपणे कार्यरत राहणे, हा होय.

## ☯ **दुरित–समस्या** (The Problem of Evil) :–

**दुरित–समस्या : एक जटिल समस्या : –**

मानवी जीवनातील दु:ख, पाप, दुरित याविषयीचे अनुभव चिंतनशील माणसाला व्यथित, दु:खी करून टाकतात / सोडतात. पाप–पुण्य, शुभ–अशुभ, शिव–अशिव या द्वंद्वांमुळे जीवन स्वभावत:च अंतर्विरोधी तर नाही ना? जीवनात, विश्वात दोन परस्परविरोधी तत्त्वांचा खेळ तर सुरू नाही ना ? असा प्रश्न पडतो. जीवनातील शुभ, शिव, पुण्यमय, सुखदायी घटनांनी माणसाची जीवनश्रध्दा आशावादी बनते तर अशुभ, अशिव, पापमय, दु:खद घटनांनी व्यक्ती निराशावादी बनते. जर सृष्टीकर्त्या, जगन्नियंत्या परमेश्वराचे स्वरूप शुभ, मंगल, शिव असेल तर विश्वात दु:ख, दुरित तरी कां आहे आणि ते कां असावे, असे विचारणे म्हणजे दुरिताची समस्या उपस्थित करणे होय. दुरित–विषयक प्रश्न कूट म्हणजे अतिशय अवघड आहे. कारण, जीवन अंतर्विरोधी असूनही ते सुसंवादी असावे, त्यात मूल्यांची सुव्यवस्था असावी, अशी मानवी बुध्दीची अपेक्षा असते. ही अपेक्षा कधी कधी फलद्रूप झाल्यासारखी वाटते तर कधी कधी तिला प्रचंड तडे जाताना दिसतात. त्यामुळे दुरित–समस्या ही धर्माच्या तत्त्वज्ञानामधील एक मोठी जटिल समस्या ठरली आहे.

**प्राथमिक अवस्थेतील माणसाची दुरितविषयक कल्पना व उपाय : –**

मानवी संस्कतीच्या प्राथमिक अवस्थेत माणसाला ही समस्या तीव्र स्वरूपात भेडसावत नाही. कारण, त्याचा संबंध त्यावेळी मुख्यत: भौतिक गरजांच्या पूर्ततेशी असतो. त्या अवस्थेतील माणसाने दुरिताची कल्पना भौतिक पातळीवर केलेली असते. म्हणून गरजा पूर्ण करणाऱ्या गोष्टींचा शोध घेणे हा दुरित–समस्येवरील उपाय ठरतो. नंतरची प्रगत अवस्था म्हणजे सृष्टीतील अतींद्रिय शक्ती माणसाला सुखी करू शकतात वा दु:खही देऊ शकतात, ही विचारधारा होय. त्यामुळे या शक्तींची किंवा दैवतांची पूजा व शांती करून त्यांच्याकडून वर मिळवणे व शाप चुकवणे याशिवाय गंडे–दोरे, ताईत, मंत्र–जप, नवस, अंगारे इत्यादी गोष्टींचा माणूस स्वीकार करतो.

**दुरितसमस्या कुणाला व कां भेडसावते ? : –**

धर्मभावनेचा विकास झाला की माणूस एकेश्वरवाद, सर्वदेववाद वगैरे तात्त्विक भूमिका स्वीकारतो आणि त्यामुळे दुरिताची समस्या अधिक संकीर्ण व अवघड बनते. दुरित कोणी निर्माण केले ? सर्वज्ञ व सर्वशक्तिमान अशा देवाने ते निर्माण केले असेल तर ते कधीच नष्ट होणार नाही, असाही विचार पुढे येतो. शिवाय, दुरितामुळे देवाच्या सर्वशक्तिमत्त्वास व शिवस्वरूपास बाधा येते काय ? या तात्त्विक समस्या माणसाला भेडसावू लागतात. त्यातूनच दुरितविषयक दृष्टिकोन पुढे आले आहेत. ते पुढीलप्रमाणे : –

**दुरितविषयक दृष्टिकोन : –**

१. **अतीतवादानुसार** (ट्रान्सेंडेंटालिझम्) **दुरित हे वास्तविक नाही**. ते अज्ञानामुळे किंवा अपुऱ्या ज्ञानामुळे जाणवते. सम्यक् ज्ञान झाले की दुरिताचा भास नष्ट होतो.

२. **काही विचारवंतांच्या मतें** विश्वात दुरित किंवा दु:ख आहे पण त्यामुळे विश्वाच्या व्यवस्थेला व विश्वकर्त्याच्या भूमिकेला बाधा येत नाही. सुख व शिव याप्रमाणे **दु:ख व दुरित हे विश्व–व्यवस्थेचे आवश्यक घटक आहेत,** असे समजून घेतले पाहिजे.

**३.** **काही विचावंतांच्या मतें** दुरित, दु:ख, पाप हे ईश्वरनिर्मिती नाही, त्याला स्वतंत्र सत्ताही नाही; तर ते म्हणजे मानवाने आपल्या संकल्प–स्वातंत्र्याच्या केलेल्या दुरुपयोगाचा परिणाम होय. अर्थात, **दुरित हे कर्मफल आहे.**

४. **काहींच्या मतें देव आणि दुरित (सैतान = सेटन) ही दोन स्वतंत्र तत्त्वे** विश्वाचे नियंत्रण करतात. त्यांच्यात सतत झगडा चालू असतो. या झगडङ्मात देव विजयी होणार आणि जगातील दुरित, दैन्य, दु:ख, पाप नष्ट होऊन आनंदाचे राज्य येणार, असा आशावाद या विचारंतांनी व्यक्त केला आहे.

५. **काहींच्या मतें** जगात सर्वकाही दु:खमय, सान्त (मर्यादित), अशिव व क्षणभंगुर आहे. **दु:खमयता हेच जीवनाचे स्वरूप आहे.** अशा व्यक्ती निराशावादी भूमिका घेतात. प्रसंगी पलायनवाद स्वीकारतात.

**६.** या सर्वांपेक्षा **वेगळा** असा पुढील **विचार**ही काही विचारवंतांनी मांडला आहे **:** जर **जग दुरितमय असेल तर** सुखाची आशा करण्यात तरी काय अर्थ ? म्हणून ही समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे स्वत:ची फसवणूक करणे होय. माणसाने **या समस्येबाबत शक्य तेवढा विचार करावा व जीवन जसे आहे तसे स्वीकारावे, हाच खरा पुरूषार्थ आहे.**

**पाश्चात्य तत्त्वज्ञानातील दुरित–कल्पना : –**

**१.** ज्याला तत्त्वज्ञानाचा जनक म्हणतात त्या **सॉक्रेटिस**ने दुर्गुणाचा किंवा दुरिताचा उगम अज्ञान असल्याचे म्हटले आहे. ज्ञान म्हणजे सद्‌गुण होय. ज्ञान म्हणजे मर्मदृष्टी व संवादी आचार होय. चित्त, वाणी व कृती यांची एकरूपता हा खरा सद्‌गुण होय. याव्यतिरिक्त सर्वत्र वासना, विकार, स्वार्थ, अहंकार यामुळे जीवन गढूळ झालेले असते. तेच दुरित होय. सॉक्रेटिसच्या मतें विवेकदृष्टीने जाणलेल्या नैतिक ध्येयानुसार वागण्याची सवय केली तर दुरित नष्ट होते.

२. सॉक्रेटिसचा शिष्य व ग्रीक तत्त्वज्ञ **प्लेटोने** जडद्रव्य हा माणसांच्या नैतिक विकासातील अडथळा मानला. शरीराचा संपर्क आणि भौतिक विकास यामुळे आत्म्यास बंध प्राप्त होतो. त्यामुळे दुरित उद्‌भवते. ज्ञान व संयमयुक्त आचरणाने दुरित नष्ट होते व शुभ आत्म्याचा लाभ होतो.

३. **सेंट ऑगस्टीन** यांच्या मतें दुरिताच्या अवस्थेमुळे शिवतत्त्व अधिक प्रभावी, प्रकाशमान ठरते. दुरित व शिव एकमेकांस पूरक आहेत. सर्वव्यापी श्रेयाचा शिव हा अंशमात्र आहे. अमंगल, अशिव व दुरित यांच्या दर्शनाने माणसांच्या मनातील मंगल व शिव दृढ होते. या अर्थाने, दुरित हे माणसांच्या नैतिक विकासास उपकारक ठरते. दुरिताचा नाश करूनच दिव्यता अनुभवास येते, हे समजून घेतले की माणूस दुरित आणि दिव्यत्व या दोन्हींच्या पलीकडे जातो. म्हणून, माणसाने सृष्टीचा अखंड विचार करावा.

४. **शॉपेनहॉवर** यांच्या मतें माणूस अंतरहित धडपडत असतो. त्याची धडपड कधीही शांत होत नाही. एका पाठोपाठ एक इच्छा पूर्ण करताना माणूस हताश होतो. त्यामुळेच तो दु:खी होतो म्हणजे त्याच्या जीवनात दुरित निर्माण होते. म्हणून जीवनाची इच्छा हेच खरे अशुभाचे कारण होय. जोपर्यंत इच्छा करणे थांबत नाही तोपर्यंत दुरिताचे तिमिर जाणार नाही.

५. **बर्ट्रांड रसेल**सारखे विज्ञाननिष्ठ व मानवतावादी तत्त्वज्ञ देखील दुरित–समस्येचा विचार करतात. त्यांच्या मतें, दुरित–समस्या ही **मानवी समस्या** आहे. म्हणून स्वप्रयत्नाने तिचे निराकरण केले पाहिजे. भौतिक समृध्दी वाढविण्यापलीकडे मानवी मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी विज्ञानाचा विशेष उपयोग झालेला नाही. म्हणून विज्ञानाने मानवी जीवनात दुरित किंवा दु:ख निर्माण होईल काय, अशी भीती ग्रासून टाकीत आहे. रसेलच्या मतें, माणसाने मरेपर्यंत शहाणपणाने वागावे. विश्वाचे व जीवनाचे वास्तव स्वरूप लक्षात घेऊन दुरिताचा नाश करावा, यातच त्याचे हित आहे.

**भारतीय तत्त्वचिंतनातील दुरित–कल्पना : –**

**१.** **चार्वाक** दर्शनाने आपल्या जडवादी भूमिकेनुसार, सुखसंपादन हा सद्‌गुण व देहसुखाकडे दुर्लक्ष हा दुर्गुण, असे म्हटले आहे. त्यांच्या मतें, दुरिताची समस्या निरर्थक आहे. परमेश्वर एक तर नाहीच आणि जे लोक तो आहे असे मानतात ते परमेश्वराला सर्वशक्तिमान मानतात; असा परमेश्वर आपल्या भक्तांचे दु:ख दूर करीत नसेल तर तो काय कामाचा, असा प्रश्न तें विचारतात. अर्थात, दुरित–समस्या चार्वाकांनी दुर्लक्षिली आहे.

२. **जैन धर्म** अनीश्वरवादी आहे. जैनांच्या तत्त्वज्ञानात 'ईश्वर व दुरित' ही समस्या उद्‌भवतच नाही. त्यांच्या मतें, दु:ख कर्मजन्य आहे. त्याचा निरास सत्कर्माने होऊ शकतो. म्हणून, दुरित हे वस्तूत: नाहीच.

३. **बौध्दांनी** क्षणिकवाद मांडला आहे. दु:ख व दोष यांनी भरलेले माणसाचे व्यावहारिक जीवन हा दुरिताचा आविष्कार आहे. जीवनातील अशाश्वतता व दु:खमयता लक्षात न घेता वासना विकारांची पूर्तता करण्याची

माणसांची धडपड सुरू असते, हे त्यांचे अज्ञान होय. तेच त्यांना दुःखी करते. दुःख, दुरित, पाप, पुण्य, सुख इत्यादी प्रश्न व्यवहारसापेक्ष आहेत, हे समजून घेतले की 'सर्वम् शून्यम्'चा अनुभव येतो. अर्थात, ती व्यक्ती दुरिताच्या पलीकडे जाते, ती **निराश = आशारहित** व पूर्णानंदी बनते. थोडक्यात, बुध्दाच्या मतें, मानवी मनाचा ज्ञानाच्या अभावातील अनुभव म्हणजे दुरित होय. सम्यक् ज्ञानाने ते नष्ट होते.

४. **शंकराचार्यांनी** माया, अविद्या (अज्ञान) या संकल्पनांच्या साह्याने दुरिताचे स्वरूप स्पष्ट केले आहे. माया किंवा अविद्या असते तोपर्यंत व्यक्तीच्या ठिकाणी दुरित किंवा दुःख असते. माया किंवा अज्ञान नष्ट झाले की दुरिताचे तिमिर जाते.

**दुरिताचे दोन प्रकार : –**

दुरित दोन प्रकारचे मानले गेले आहे. **१. नैसर्गिक दुरित व २. नैतिक दुरित.** निसर्ग–संबंधात नैसर्गिक दुरित ही संकल्पना स्पष्ट होते. दुष्काळ, भूकंप, अतिवृष्टी, ज्वलामुखी, रोगाच्या साथी इत्यादी आपत्ती म्हणजे नैसर्गिक दुरित होय. माणसांचे कर्म व त्यामागील त्यांचे संकल्पस्वातंत्र्य ही नैतिक दुरिताची उगमस्थाने आहेत. माणसांच्या प्रेरणा, वासना यांचे दुष्परिणाम म्हणून व्यक्तीला दुःख प्राप्त होते. म्हणून तिच्या दुरिताबद्दल ती स्वतःच जबाबदार आहे.

नैसर्गिक दुरित व नैतिक दुरित यांचा परस्परसंबंध आहे किंवा नाही, याबाबत निश्चित उत्तर देता येत नाही. कारण, मानवी जीवनात येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीदेखील मानवांच्या पापांचे फल आहे, असे धर्मचिंतकांनी सांगितले आहे. सर्व धर्मग्रंथांमध्ये तसे उल्लेख आहेत. त्यामुळे दुरित–समस्या अधिकच बिकट होते. तिच्यावर निश्चित तोडगा मिळत नाही.

दुरिताची निर्मिती कशी झाली याबाबतही अनेकांनी अनेक मते मांडली आहेत. त्यातूनच वरील विवेचनाचा सार व्यक्त होतो. तो असा – स्वविषयक अज्ञान आणि काम, क्रोध, लोभ इत्यादींचा अतिरेक ही दुरिताची उगमस्थाने आहेत. स्वतः ईश्वरानेच सृष्टीचक्र चालविण्यासाठी प्राण्यांना विकारवश केले असल्यामुळे दुरिताचा संपूर्ण नाश करणे कदापि शक्य नाही. तथापि वैयक्तिक जीवनात दुरिताचा संपूर्ण लय करणे शक्य आहे, असे अवतारी पुरूषांनी, प्रेषितांनी व साधुसंतांनी सांगितले आहे.

## ☯ दहशतवाद (Terrorism) : -

२०व्या शतकात दहशतवाद हा संपूर्ण विश्वात एक अमानवी कृतीजन्य समस्या या रूपाने पुढे आला आहे. दररोज वर्तमानपत्रातून व प्रसारमाध्यमांतून माणसांच्या हत्या, लूटमार, विमान अपहरण, बस–ट्रेन यांत बाँबस्फोट, आर.डी.एक्स. स्फोटके याप्रकारच्या दहशतवादी कृत्यांच्या / साधनांच्या बातम्या येऊ लागल्या/येत आहेत. मंदिरे, मस्जिद, गुरूद्वारा, महत्त्वाचे असे सार्वजनिक विशिष्ट भूभाग हे दहशतवादाच्या छायेखाली आहेत.

**दहशतवादाचे स्वरूप व त्याची व्याख्या :** दहशतवादाला आतंकवाद असेही एक नांव आहे. दहशत म्हणजे भीती होय आणि वाद म्हणजे विचार किंवा सिध्दान्त होय. भय दाखवून किंवा त्रास देऊन आपले ध्येय गाठण्याचा सिध्दान्त म्हणजे दहशतवाद होय. राज्यातील सत्तेला अस्थिर बनविणे, हिंसात्मक कारवाया करून जनतेच्या मनात भीती निर्माण करणे व त्या आधारे सरकारकडून आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी सरकारला विवश करणे, हा दहशतवादामागील प्रमुख उद्देश असतो. दहशतवाद हा स्थानिक सरकारच्या विरुध्द असणारे एक प्रकारचे बंडच असते. अधिक व्यापक दृष्टीने विचार केला तर तो विभिन्न लोकशाही व्यवस्थेविरुध्दचे एक युध्द असते.

भारत सरकारने दहशतवादी विरोधी विधेयकात दहशतवादाची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे : सरकार किंवा जनतेला भयभीत करणे, विभिन्न वर्गांच्या लोकांत वैमनस्य निर्माण करणे, किंवा शांती भंग करण्याच्या उद्देशाने बाँबस्फोट, मिसाईल्सचा प्रयोग करून संपत्ती नष्ट करणे, रासायनिक अस्त्रांचा वापर करणे किंवा अत्यावश्यक सेवांमध्ये असुरक्षितता निर्माण करण्याच्या उद्देशाने केल्या जाणाऱ्या कृतींमागील विचाराला दहशतवाद म्हणतात. बी. एम्. जेकिन्स यांनी आपल्या 'दि स्टडी ऑफ टेररीझम्' या पुस्तकात दहशतवादाचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे : दहशतवादी कृत्यांमध्ये बहुधा विशिष्ट मागण्यांबरोबरच हिंसा किंवा हिंसेची धमकी समाविष्ट असते; हिंसेची शिकार सामान्य जनता असते तर त्याचे लक्ष्य हे राजनीतिक असते व त्या आधारे दहशतवादी हे भौतिक वस्तूंचा विनाश करून जनता व शासनावर त्याचा दबाव आणण्याचा प्रयत्न करतात.

**दहशतवादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :** भिन्न भिन्न मुद्द्यांना धरून दहशतवाद हा फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. प्राचीन काळात तो अत्याचारी शासनाचा विरोध करण्यासाठी केला जात असे. प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस ॲक्वायनस यांच्या मते जर शासक अत्याचारी असेल तर त्याचा वध करणे हे उचित होय. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर व १९व्या शतकात शोषित व पीडित लोकांचे शस्त्र हे दहशतवादच होते. त्यांच्या मते क्रांतीचे फळ हे आपल्याला तेव्हाच प्राप्त होऊ शकते जेव्हा हिंसात्मक कार्ये केली जातील. रशियन राज्यक्रांतीतही दहशतवाद जाणवतो. जनतेची इच्छा नामक मुक्ती–आंदोलनाने दहशतवादाला एक पध्दती म्हणून स्वीकारले.

प्राचीन भारतात गुप्तकाळात ठगांचा दहशतवाद होता. कौटिल्याने आपल्या राजनीतित हिंसा व दहशतवादी कारवायांना अनुमती दिली होती व त्याचा परिणाम म्हणजे राज्याचे कायदे हे अधिक प्रभावी बनतात, असे त्याने म्हटले आहे. भारत पारतंत्र्यात होता

तेव्हाही अनेक देशभक्तांनी ब्रिटिशांच्या विरोधात दहशतवादी कारवाया केल्या होत्या. बंगाल आणि महाराष्ट्रात क्रांतीकारी आंदोलने झाली. देशभक्त भगतसिंगाने केलेला बाँबस्फोट व नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा फॉरवर्ड ब्लॉक व 'तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा' हा नारा तसेच १८५७ चा उठाव तत्कालीन अन्यायकारी राजवटीविरुध्द योजिलेल्या दहशतवादी कृतीची उदाहरणे होत. थोडक्यात, दहशतवाद हा अगदी प्राचीन काळापासून वेगवेगळ्या देशांमध्ये पहावयास मिळतो. क्रांतीचे साधन म्हणून दहशतवादी कारवाया विश्वात सक्रिय आहेत.

**आंतरराष्ट्रीय दहशतवाद :** दहशतवादी कार्य हे कोणत्यातरी व्यक्ती किंवा समूहाद्वारे सरकारविरुध्द पण राष्ट्रीय सीमेच्या बाहेर केले जाते तेव्हा तो आंतरराष्ट्रीय दहशतवाद समजला जातो. विशेषत: १९६०पासून प्रभावीपणे जाणवू लागलेला आंतरराष्ट्रीय दहशतवाद हा प्रामुख्याने जर्मनी, इटली, अमेरिका, फ्रान्स या देशात होता. नंतर भारतातही त्याने डोके काढले. १९६७ मध्ये पश्चिम बंगालमध्ये साम्यवादी व वामपंथी दलाने दार्जिलिंग भागात नक्षलवादी विचारसरणीची दहशत निर्माण केली व हळूहळू आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, बिहार, मध्य प्रदेश, त्रिपुरा इत्यादी भागात तो पसरला. १९७० च्या दरम्यान विनाशकारी प्रयोग दहशतवाद्यानी सुरू केले. १९८७ मध्ये आंध्रप्रदेशातील गोदावरी जिल्ह्यात आठ सरकारी कर्मचाऱ्यांचे अपहरण, ११ सप्टेंबर २००१ ला अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ला, २६/११ चा मुंबईतील तसेच ताजमहल व ओबेराय हॉटेलवरील हल्ले, पुण्यातील जर्मन बेकरी प्रकरण ही सर्व आतंकवादी कृत्याचीच उदाहरणे होत.

**दहशतवादाची कारणे :** वाढती बेरोजगारी, वस्तूंच्या वाढत्या किंमती, महागाई या आर्थिक कारणांमुळे युवकांच्या मनांत जो निर्माण होणारा विद्रोह, योग्य व नैतिक शिक्षणाचा अभाव, सरकारविरुध्द असंतोष, संपूर्ण व्यवस्थेचा अस्वीकार, व राजकारण्यांचा विरोध ही दहशतवादाची कारणे मानली जातात. वैज्ञानिक व यांत्रिक प्रगतीजन्य दळणवळण साधनांमुळे बाजार, विमानतळ, बसस्थानके, रेल्वे यासारख्या कोणत्याही ठिकाणी आक्रमण करता येऊ लागले. टेलिफोन्स, मोबाईल फोन्स, रेडिओ, टी.व्ही. इंटरनेट तसेच लहानमोठ्या आकाराची आधुनिक शस्त्रास्त्रे इत्यादींमुळे आतंकवादाची क्षमता झपाट्याने व असीमितपणे वाढली. चीन, पाकिस्तान व बांगला देश या शेजारच्या राष्ट्रांकडून दहशतवाद्यांना आश्रय देणे, शस्त्रास्त्रे पुरविणे व प्रशिक्षण देणे यासारखी उदा. नागालँड, मिझोरम, मणिपूर, त्रिपुरा, आसाम, जम्मुकाश्मिर, पंजाब याठिकाणी घडलेली कृत्येही आंतरराष्ट्रीय दहशतवाद बळकट होण्यास कारणीभूत झाल्याचे दिसून येते.

**दहशतवादावरील उपाय :** दहशतवादासारख्या विश्वव्यापी समस्येचे निराकरण करणे ही एक मोठी समस्या होऊन बसली आहे. प्रत्येक देशाचे सरकार व आंतरराष्ट्रीय समुदाय यावर नियंत्रण करण्याचा प्रयत्न करीत आहे. याचे दोन प्रकार मानता येतात :

१. **सैनिकी उपाय :** दहशतवादाला बलपूर्वक रोखण, त्याविरुध्द सुरक्षारक्षक नियुक्त करणे हे सैनिकी उपाय आहेत. त्याचे **अ)** प्रतिबंधात्मक उपाय, **ब)** सुटकेचा उपाय व **क)** प्रतिक्रियात्मक उपाय असे तीन भाग आहेत. सैनिकांद्वारे दहशतवादी कारवायांना रोखणे, त्यावर आक्रमण करणे हे प्रतिबंधात्मक उपाय होत. कधीकधी अधिकारी किंवा काही व्यक्तींना बंदी बनविले जाते तेव्हा दहशतवाद्यांच्या मागण्या पूर्ण कराच्या लजागतात तेव्हा सुटकेचे उपाय अवलंबिलेले असतात. दहशतवाद्यांवर हल्ला करणे, त्यांना नष्ट करणे, त्यांच्यावर छापा मारणे हे प्रतिक्रियात्मक उपाय होत. या उपायांमुळे सामान्य जनतेला क्षती / हानी पोहचू नये अशी काळजी घेतली जाते / घ्यावयाची असते.

२. **राजनैतिक व कायदेविषयक उपाय :** संयुक्त राष्ट्र संघटने(यूनो)मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर दहशतवादी संघटनांविरुध्द चर्चा, ठोस निर्णय/ठराव पास करणे व एकमताने त्यावर कारवाई करणे तसेच त्यासाठी राष्ट्रांनी एकमेकांना आवश्यक ते सहकार्य करणे म्हणजे राजनैतिक व कायदेशीर उपाय करणे होय.

## ☯ रससिध्दान्त / रसविषयक उपपत्ती :

**रस : व्याख्या व प्रकार –**

नाट्य–काव्यातील एक प्राणभूत तत्त्व म्हणजे रस होय. 'रस्यते इति रस:' म्हणजे ज्याचा आस्वाद घेतला जातो त्या नाट्यातील, काव्यातील, वाङ्मयातील आस्वादनीय भावस्थितीला रस म्हणतात. शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स व अद्‌भूत हे आठ प्रमुख रस आहेत. काही काव्यशास्त्रज्ञांनी रसांची कमी–अधिक संख्या मानली आहे. उदा. उपरोक्त आठ रसांत शांत या आणखी एका रसाची भर घालून एकूण नऊ रस असल्याचेही वारंवार उल्लेख केल्याचे आढळते.

**रसाचे स्वरूप –**

ज्याचा आपण आस्वाद घेतो, जो आपण आवडीने चाखतो, तो रस होय. मात्र तो रस जिभेने चाखावयाचा नसून, नेत्र किंवा कान या इंद्रियांच्या द्वारें चाखावयाचा असतो. इंद्रियांनी रसाचे ग्रहण केल्सानंतर त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या सुखदु:खादी संवेदना मनाकडे जाऊन पोचतात आणि त्या तिथे पोचल्यावर मनाचे सर्व व्यापार जर सुरळित चालू असले, तर मनाच्या ठिकाणी निसर्गत:च असलेल्या हर्ष, शोक, विषाद इत्यादी भावना, त्या त्या संवेदनांना अनुसरून जागृत होतात. संवेदना ज्या मानाने कमी अधिक तीव्र असतील त्या मानाने भावना कमी अधिक उत्कट होऊन त्यांचे प्रतिबिंब मनुष्याच्याचर्येवर व इतर

अवयवांवर उमटते. एखाद्या भावनेने चेहरा खुलून दिसू लागतो किंव कपाळाल्या आठ्या पछडतात, अंगावर रोमांच उभे राहतात किंवा सर्व शरीर भीतीने थरथरून एकदम झटका बसल्यासारखे होते. भावनेची परिणती झाली की हर्ष, शोक, विषाद, तिरस्कार यांचे निदर्शक असे 'वाहवा', 'छी:', 'शी:', 'अरेरे' इत्यादी उद्‌गार नकळत तोंडातून बाहेर पडून,

ज्या प्रसंगामुळे भावनांची खळबख उडाली, त्या प्रसंगांना जणूकाय प्रतिकिया म्हणून इतर इंद्रियांचीही तदनुरूप हालचाल सुरू होते. कवीने वर्णिलेली परिस्थिती किंवा प्रसंग जणूकाय आपल्या समोर प्रत्यक्ष घडत आहे, आपणच त्याचा अनुभव घेत आहोत, असा त्याला आभास होतो, तो त्यात समरस होतो. असे झाले म्हणजे त्याला त्या विषयाची गोडी लागली असे आपण म्हणतो.

**भाव / भावना म्हणजे काय ? –**

अशा प्रकारची गोडी काव्यात किंवा नाटकात उत्पन्न होते, ती मनुष्याच्या अंत:करणात ज्या काही विशिष्ट अशा मनोभावना असतात त्यांचा सर्व बाजूंनी परिपोष केल्यामुळे होत असते. त्या मनोभावनांचे उठावदार चित्रदिसून येईल त्या काव्याला किंवा नाटकाला रसयुक्त म्हटले जाते. या ज्या विशिष्ट मनोभावना आहेत, त्यांचा उत्तम परिपाक ज्या काव्यात झाला असेल ते काव्य गोड वाटते. पुन:पुन्हा त्याचा आस्वाद घ्यावासा वाटतो म्हणून त्या विशिष्ट मनोभावनांनाही रस हे नांव साहित्यशास्त्रज्ञांनी दिले आहे. राग येणे, आनंद होणे, किळस येणे वगैरे जे मनाचे धर्म सर्वांनाच अनुभवाला येणारे आहेत, त्यांनाच काव्यशास्त्रवेत्त्यांनी भाव किंवा भावना या संज्ञा दिल्या आहेत. या भावनांचा आयुष्यात ज्याला अनुभव आला नाही, असा मनुष्य मिळणे अशक्य आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्या मनात या भावना वास्तव्य करून असतात आणि चेतना मिळताच पाण्यात टाकलेल्या तेलाच्या थेंबाप्रमाणे विस्तार पावून मनावर ताबा मिळवतात. हास्य, क्रोध, उत्साह, शोक, भीती, किळस, आश्चर्य या भावना लहान मुलातही दिसून येतात. मोठेपणीसुध्दा पदोपदी याच भावनांचा निरनिराळ्या प्रकारे प्रत्येक मनुष्य अनुभव घेत असतो.

**रसप्रक्रियेचे स्वरूप – भरतमुनीचे मत –**

या ज्या मूलभूत आणि स्वयंभू अशा मनुष्याच्या अंतरंगातल्या भावना आहेत त्यांनाच अनुलक्षून काव्यशास्त्रवेत्त्यांनी रस ठरविले आहेत. भरताचे नाट्यशास्त्र हा रसप्रक्रियेचे स्वरूप सांगणारा पहिला ग्रंथ मानला जातो. भरताने सांगितलेले रससूत्र पुढीलप्रमाणे आहे – 'विभावानुसंचारिसंयोगाद्रसनिष्पत्ति: ।' (*नाट्यशास्त्र, ६.३*) (अर्थ = विभाव, अनुभाव वसंचारी भाव यांच्या संयोगातून रसनिष्पत्ती होते.) निष्पत्ती म्हणजे अभिव्यक्ती, उत्पत्ती, पूर्णता वा परिपक्वता होय. रसप्रक्रिया सांगताना ज्या पारिभाषिक संज्ञा वापरल्या जातात त्या समजून घेताना रससिध्दान्त उकलत जातो. म्हणून स्थायीभाव, विभाव, अनुभाव व संचारी (= व्यभिचारी) भाव या संज्ञा समजून घेऊयात –

**स्थायीभाव : –**

स्थायीभाव म्हणजे कायम टिकणारे भाव किंवा धर्म होत. मनुष्याच्या अंतरातले हर्ष, शोक, विषाद वगैरे जे मूलभूत व स्वयंभू असे भाव आहेत, त्यांना स्थायीभाव असे म्हणतात. स्थायीभावांचे लक्षण वा स्वरूप पुढीलप्रमाणे : ज्या भावना मूलत:च अंत:करणात असतात व रसाच्या प्रभावाने ज्या वृध्दिंगत होऊन मनाला व्यापून टाकतात आणि नंतरही ज्यांचा ठसा अंत:करणावर बराच काळ उमटून राहतो, त्या भावभावनांना स्थायीभाव अशी संज्ञा आहें. रती, हास्य, शोक, क्रोध, उत्साह, भीती, जुगुप्सा किंव किळस व विस्मय असे आठ स्थायीभाव असून त्यावर अनुक्रमे **शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, व अद्‌भूत हे आठ रस** आधारलेले आहेत. शांतरसाचा स्थायीभाव हा अभावात्मक आहे. निर्विकार होणे म्हणजे कोणत्याही प्रकारची संवेदना उत्पन्न न होता देवघरातील नंदादीपाच्या ज्योतीप्रमाणे अविचल स्थिती येणे, भावनारहित होणे, हा शांतरसाचा स्थायीभाव आहे. स्नेह हा प्रेयान रसाचा स्थायीभाव

आहे आणि ईश्वरविषयक प्रेम हा भक्तिरसाचा स्थायीभाव आहे. नंदादीपाच्या ज्योतीप्रमाणे अविचल प्रेयान् रसाचा स्थायीभाव आहे आणि ईश्वरविषयक प्रेम हा भक्तिरसाचा स्थायीभाव आहे.

**विभाव : –**

वासनारूपाने अंतरात असलेल्या रत्यादी स्थायीभावनांना आस्वादयोग्य करून रसपदवीला नेणारे ते विभाव होत. स्थायी भासवांना चेतना देऊन त्यांचा उत्कर्ष करण्यास ते कारणीभूत होतात. विभावाचे १. आलंबन विभाव व २. उद्दीपन विभाव असे दोन प्रकार आहेत. भावनांचा परिपोष करण्यास कारणीभूत होणारी व्यक्ती म्हणजे काव्यातले नायक वा नायिका यांना आलंबन विभाग म्हणतात आणि नायकनायिकांच्या वेगवेगळ्या कृती त्याचप्रमाणे देश, काल, परिस्थिती यांना उद्दीपन विभाव म्हणतात. रसाचे उद्दीपन यांच्यामुळेच होत असते.

**अनुभाव : –**

स्थायी भावांचा अनुभव घडविणारे म्हणजेच त्यांचा शरीरावर परिणाम दाखविणारे ते अनुभाव होत. एकदम स्तंभित होणे, अंग घामाने डबडबणे, रोमांच डी राहणे, गळा भरून (दाटून) येणे, कंप उत्पन्न होणे, चेहरा पांढरा फटफटीत पडणे, डोळ्यातून अश्रू येणे, चेतना नष्ट होणे इत्यादी प्रकार अनुभाव या सदरात येतात.

**व्यभिचारी / संचारी भाव : –**

स्थायी भावाचा परिपोष करून त्याला सर्वत्र (काव्यात) संचारयोग्य करणारे ते व्यभिचारी भाव होत. अमुक रसाचे अमुकच व्यभिचारी भाव असे निश्चित नसते. सामान्यपणे कोणत्याही रसात हे येऊ शकतात म्हणूनच त्यांना व्यभिचारी किंवा संचारी असे म्हटले आहे. कोंणत्याही रसाचा उत्कर्ष करण्यासाठी हे येतात आणि आपली छोटीसी छटा दाखवून निघून जातात. अळवावरच्या थेंबासारखी यांची स्थिती असते. पाठीमागून (नंतर) यांचा ठसा काहीच राहात नाही. हे व्यभिचारी भाव एकूण तेहतीस (३३) आहेत. : वैराग्य, ग्लानी, शंका, मत्सर, मद, श्रम, आळस, दैन्य, चिंता, मूर्च्छा, स्मृती, धैर्य, लज्जा, चपलता, आवेग, जडता, गर्व, खेद, उत्सुकता, झोप, अपस्मार, स्वप्न, जागृती, क्रोध, मनोविकार लपविणे, उग्रपणा, मती, व्याधी, उन्माद, मरण, त्रास अणि वितर्क.

**रसांचे सोदाहरण स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे** (उदाहरणार्थ दोन रस घेतले आहेत) : –

**शृंगाररस :**

हा सर्व रसांचा राजा आहे. रती म्हणजे पुरुषाला स्त्रीविषयी व स्त्रीला पुरुषाविषयी वाटणारे कामुक प्रेम. की भावना या रसात आरंभापासून शेवटपर्यंत प्रामुख्याने असते. (म्हणजे **प्रेम हा स्थायीभाव** होय.) परस्परांवर अनुरक्त झालेल्या दोन व्यक्तींवर हा रस आधारून राहतो म्हणून त्या व्यक्ती शृंगार रसाचे आलंबन विभाव होत. पिठोरी चांदणे, वसंत ऋतुचे आगमन, अनुरागयुक्त संभाषण, कामक्रीडेची चित्रे, आकर्षक वेशभूषा, प्रेमगीतांचे श्रवण, एकान्त, इत्यादी गोष्टींनी रती या भावनेचे उद्दीपन होते, म्हणून या प्रकारांना (गोष्टींना) **शृंगाररसाचे उद्दीपन विभाव** असे म्हणतात. कामासक्तीचे उद्दीपन झाले, की मग भुवया आकुंचित करणे, कटाक्ष फेकणे, स्पर्श करणे, आलिंगन देणे इत्यादी ज्या गोष्टी घडतात ते **शृंगाररसाचे अनुभाव** होत. हास्य उत्पन्न होणे, लाज वाटणे, शरीर गळल्यासारखे होणे, कंटाळा वाटणे, आळस येणे, हे शृंगाररसातले **व्यभिचारी (संचारी)** भाव होत.

**हास्यरस :**

हसू येणे ही प्रमुख भावना या रसाचा स्थायी भाव होय. एखाद्या शरीराचा बेडौल आकार, विचित्र पोशाख, बोलण्यात व वागण्यात विसंगती यासारख्या गोष्टी पाहिल्या की माणसाला हसू येते. ज्या व्यक्तीला हसू येते / येईल ती व्यक्ती हास्यरसाचाआलंबन विभाव होय. त्या व्यक्तीच्या ज्या बोलण्याचालण्यामुळे हसू येते त्या तिच्या कृती हास्य रसाचे उद्दीपन विभाव होत. हसताना डोळे आकुंचित हाकेणे, तोंड उघडणे, गाल फुगणे इत्यादी जे प्रकार होतात ते या रसाचे अनुभाव होत. तर, श्रम होणे हा या रसातला व्यभिचारी भावच होय. (इतर रसांचा असा विचार करून पाहा.)

## ☯ लोकधर्मी व नाट्यधर्मी :

रसविचार हा प्रामुख्याने लोकस्वभाव अथवा लोकव्यवहार आणि नाट्य अथवा काव्य यांच्याशी संबंधित आहे. नाटकातील अभिनय हा लोकस्वभाव वा लोकव्यवहार यांच्याविषयीचा असतो. लोकव्यवहार म्हणजे लोकांचे आचारविचार, रीत–रिवाज होत.

रसप्रतीति किंवा रसास्वाद अथवा रसानुभव म्हणून ज्याला म्हणतात तो मात्र फक्त नाट्यातच अथवा साहित्यातच आपणास आढळतो. लौकिक जीवनात त्याला गौण / दुय्यम स्थान असते; लौकिक जीवनात आपण प्रेम, शोक, भय, अनुभवतो पण त्याचे स्वरूप आणि साहित्यात अनुभवाला येणाऱ्या शृंगार, करुण, भयानक इत्यादी रसांचे स्वरूप मात्र एकच नसते. लौकिक जीवनातला अनुभव हा सुखदु:खमिश्रित असतो, तर नाट्यकाव्यादी साहित्यातला अनुभव जसा आस्वाद घेण्याजोगा म्हणजे आस्वाद्य असतो. नाट्यकाव्यादीतला त्यांचा अनुभव हा ताटस्थ्यभावामुळे सुखकारक व म्हणून कलेची पातळी गाठणारा असतो. म्हणूनच 'रस नाट्यातच म्हणजे साहित्यातच असतो, लौकिक जीवनात नसतो', (नाट्ये एव रस: न तु लोके)असे अभिनवगुप्ताने म्हटले आहे.

आपण नाटक पाहतो म्हणजे काय करतो? तर, दैनंदिन जीवनात जो लोकांचा व्यापार चालतो त्याचा अभिनय नटाकडून केला जातो, तो आपण पाहतो. उदा. मुलगी सासरीं चाललेली असताना पिताही भारावलेल्या अंत:करणाने, डबडबलेल्या डोळ्यांनी तिला निरोप देत आहे, असा अभिनय करणाऱ्या नटाचा तो विरहानुभव एका विशिष्ट पित्याचा राहात नाही. नाटक पाहणाऱ्या आपणालाही तो अनुभवास येत असतो. त्यावेळी आपण एक व्यक्ती राहात नसतो तर आपण त्यावेळी फक्त रसिक असतो. परिणामत: तो शोक अथवा विरह आस्वाद्य होतो व आपण करुण रसाचा अनुभव घेतो. थोडक्यात, दैनंदिन जीवनातला किंवा लोकव्यवहारातला 'शोक' हा 'करुणरसात' पर्यवसित होतो.

हाच प्रसंग जेव्हा आपण रंगभूमीवर पाहतो तेव्हा तो नटाच्या अभिनयातून व्यक्त होतो. तो त्या नटाचा शोक नसतो, तर त्या नटाने केवळ पित्याच्या विरहाचे सोंग / भूमिका केलेले / केलेली असते, अभिनय केलेला असतो. एका अर्थी रसिक प्रेक्षक या नात्याने आपण त्या विरहाचे सोंगच पाहात असतो. या सोंगापासूनच / भूमिकेपासूनच रसिक प्रेक्षकाला खराखुरा रसास्वाद मिळत असतो. जीवनात चित्तवृत्ती निर्माण होत असतात, तर नाटकात त्यांचा अभिनय केला जात असतो. यावरून, लोकव्यवहार म्हणजे लोकधर्म हा साहित्याचा विषय असतो, तर तोच जेव्हा साहित्यिकाच्या प्रतिभाबलावर वा नटाच्या अभिनयकौशल्याने अभिव्यक्त होतो तेव्हा त्याचे स्वरूप लौकिक न राहता अलौकिक होते. निराळ्या शब्दात, सांगायचे झाले तर असे म्हणावे लागते, की लोकस्वभाव अथवा लोकधर्म हा लौकिक असतो तर नाट्यधर्म अलौकिक असतो.

लोकधर्माला नाट्यधर्माचा आधार कशाप्रकारचा असतो हे समजावून सांगताना अभिनव गुप्ताने 'भित्तिस्थानीय' असे म्हटले आहे. भिंतीवरच्या चित्राला जसा भिंतीचा आधार असतो, पण चित्र म्हणजे भिंत नव्हे ž तसेच साहित्य म्हणजे प्रत्यक्ष जीवन नव्हे, हे विसरून चालणार नाही. चित्रामुळे भिंतीचे दर्शन होते व भिंत सुंदर दिसते त्याचप्रमाणे नाट्यधर्मामुळे च लोकस्वभाव वा लोकधर्म सुंदर दिसतो. म्हणूनच नाट्य हा एक सौंदर्यव्यापार आहे, असे म्हटले जाते.

## ☯ कला म्हणजे अनुकृती (आर्ट ॲज् इमिटेशन) – कलास्वरूपविषयक एक उपपत्ती :

**प्लेटो व ॲरिस्टॉटल यांचे विचार :** कल्पनाशक्ती (इमॅजिनेशन) हे कलानिर्मितीसाठी आवश्यक असे एक तत्त्व आहे. परंतु, कलाकृतीच्या निर्मितीचा एकमेव कारक घटक कल्पनाशक्ती आहे, असे मात्र म्हणता येत नाही. वास्तवाची अभिव्यक्ती करणे अथवा वास्तवचित्रण करणे हाही कलाकृतीच्या संदर्भातला एक आवश्यक घटक म्हणून सांगितला जातो. परिणामी, 'कलाकृती ही अनुकृती असते', या दृष्टिकोनाचा कलामीमांसेत विचार झाला आहे. कलेत 'अनुकृतीची अनुकृती' असते, हा प्लेटोचा विचार होता तर 'कलेत मानवी कर्मांग्ची अनुकृती असते', हा ॲरिस्टॉटलचा विचार होता.

**कलाकृतीविषयक विचाराची चार अंगे :** पाश्चात्य साहित्यविचारात काव्याविषयीचे १. अनुकृतीनिष्ठ, २. परिणामनिष्ठ, ३. अभिव्यक्तिनिष्ठ व ४. वस्तुनिष्ठ असे चार प्रकारचे सिध्दान्त आढळतात. साहित्यिक कलाकृतीविषयक विचार करताना साधारणपणे या चार अंगांनी विचार केला जातो.

**अनुकृतीनिष्ठ सिध्दान्त :** कलास्वरूपविषयक अनुकृतीनिष्ठ सिध्दान्ताचे मूळ ॲरिस्टॉटलच्या 'काव्यशास्त्रात' आहे. महाकाव्य, शोकान्तिका, सुखान्तिका या अनुकृतीच्या पध्दती आहे, असे त्याने म्हटले असून फक्त भाषेच्या साह्याने अनुकृती करणाऱ्या कलेचा त्याने निर्देश केला आहे. अर्थात, तेथे त्याला साहित्यकलेविषयी सांगावयाचे आहे. ॲरिस्टॉटलच्या मते, कर्मे करणारी माणसे हा कलाकृतीचा विषय असतात. अनुकृती करण्याची प्रेरणा आणि मेळ व ताल याविषयी प्रेरणा या दोन कारणांमुळे काव्याची निर्मिती होते / झाली, असे तो सांगतो.

अनुकृतीनिष्ठ सिध्दान्तानुसार काव्य आणि इतर कला या जगाची अनुकृती करतात. अनुकृती हे कलांचे सार–तत्त्व आहे आणि सर्व कला आपापल्या माध्यमांच्या साहाय्याने अनुकृती करतात. या विचारानुसार कलाकृती हे जीवनाचे प्रतिरूप, प्रतिबिंब अथवा दर्पण आहे. कवितेच्या अनुकृतीनिष्ठ व्याख्येनुसार कविता ही 'प्रतिमा', 'प्रतिच्छाया', 'नक्कल', 'प्रतिरूप' आहे / असते. त्यामुळे कवितेने जगाचे वस्तुनिष्ठ चित्र सादर करावे, अशी येथे धारणा आहे. ही अभिजातवादी संकल्पना आहे.

**ॲरिस्टॉटलच्या 'काव्यशास्त्रा'तील अनुकृतीनिष्ठ सिध्दान्ताचा अन्वयार्थ :** ॲरिस्टॉटलकृत काव्यशास्त्राच्या भाष्यकाराने अनुकृतीसिध्दान्ताचा अन्वयार्थ असा केला आहे : 'आपल्या स्वाभाविक रूपात एखादी परिस्थिती, एखादा अनुभव किंवा एखादी व्यक्ती जेवढा परिणाम करू शकेल तो निर्माण करणे हे ॲरिस्टॉटलच्या अनुकृतीविचारात अभिप्रेत असावे.'

**ॲरिस्टॉटल व भरतमुनी यांच्या विचारातील साम्य :** ॲरिस्टॉटलचा अनुकृतीसिध्दान्त आणि भरतमुनींचा नाट्यशास्त्रातील विचार यांतील साम्य लक्षणीय आहे. 'त्रैलोक्यातील लोकचरिताचे अनुकरण नाट्यात असते', असे भरताने म्हटले आहे. लोकचरताचे अनुकरण किंवा निसर्गाची अनुकृती म्हणजे जीवनाची हुबेहुब प्रतिकृती किंवा प्रतिबिंब नव्हे ! नाटक जीवनाचे दर्शन घडविते पण त्यात रिप्रॉडक्शन नसते तर रि–क्रिएशन असते; स्वाभाविक वास्तवाची पुनरावृत्ती करतान, वास्तवाहून वेगळे असेही साहित्यकलाकृतीत असते. थोडक्यात, नाटक म्हणजे लोकस्वभावाची ननुकृतीच पण, अनुकृती भाव व अवस्था यांचीच असते; व्यक्तींची नसते.

::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::

**दुरित–समस्या / दुरिताची समस्या म्हणजे काय? (व्हाट इज् दि प्रॉब्लेम ऑफ इव्हिल्?)**

**उत्तर :** सृष्टीकर्ता परमेश्वर जर सर्वज्ञ व सर्वशक्तिमान आहे तसेच त्याचे स्वरूप जर शुभ, मंगल, शिव आहे तर विश्वात दु:ख, पाप, वाईटपण का आहे व असावे, परमेश्वरालाही दुरिताची मर्यादा पडते काय, असा प्रश्न विचारणे म्हणजे दुरिताची समस्या उपस्थित करणे होय. जीवन अंतर्विरोधी, सुखदु:खमय, नाशिवंत असूनही ते सुसंवादी, आनंदी व अमर असावे, त्यात मूल्यांची व्यवस्था असावी, अशी मानवी बुधीची अपेक्षा असल्यामुळेच दुरिताची समस्या उत्तरोत्तर तीव्र होत जाते.

**दुरिताची उदाहरणे सांगा –**

दुरिताचे मुख्य दोन प्रकार आहेत : – १) नैसर्गिक दुरित व २) नैतिक दुरित. दुष्काळ, भूकंप, अतिवृष्टी, ज्वालामुखी, त्सुनामी लाटा, रोगाच्या साथी इत्यादी आपत्ती म्हणजे नैसर्गिक दरिते होत; तर माणसांकडून होणारा संकल्पस्वातंत्र्याचा दुरूपयोग व त्यामुळे होणारा दुराचार, भ्रष्टाचार, वामाचार, कर्तव्यच्युती, भेदभावात्मक व्यवहार,

संकुचित निष्ठांपायी होणारी युध्दे, जातीय, धर्मीय वगैरे तंटबखेडे इत्यादी नैतिक दुरिताची उदाहरणे होत. सद्सद्विवेकबुध्दी सोडून वासनावश होणे व त्यामुळे स्वत:चा आध्यात्मिक अध:पात करून घेणे हेही नैतिक दुरिताचे आत्मस्वरूपविषयक अज्ञानामुळे घडणारे दुरित / वाईट होय.

**२४. दुरित–समस्येबाबत ख्रिश्चन विचारवंतांनी दिलेली स्पष्टीकरणे कोणती, ते थोडक्यात सांगा. ( व्हाट आर दि थ्री ख्रिश्चन रिस्पॉन्सेस टू दि प्रॉब्लेम ऑफ इव्हिल्? स्टेट ब्रिफली.)**

**उत्तर :** दुरिताचा उगम, स्वरूप व त्याचे निराकरण करण्याच्या दिशेने ख्रिश्चन विचारवंतांनी तीन प्रकारची स्पष्टीकरणे प्रस्तुत केली आहेत : **१) ऑगस्टिनियन रिस्पॉन्स** – माणूस मूळात चांगला होता परंतु तो त्याच्या मूळातील चांगुलपणापासून / अच्युत स्वरूपापासून ढळला, त्याचा अध:पात झाला. **२) आयरियन रिस्पॉन्स** – अतिशय अपूर्ण, दोषयुक्त अशा जगातून अतिशय पूर्ण, निर्दोष असा मानव होणे अपेक्षित आहे; अर्थात, विश्वच दुरितयुक्त आहे. **३) आधुनिक धर्मशास्त्रातील प्रक्रिया उपपत्ती** – या उपपत्तीनुसार ईश्वर सर्वशक्तिमान नसून तो वस्तूत: मानवांच्यात व निसर्गात निर्माण होणाऱ्या / उद्‌भवणाऱ्या दुरिताला जबाबदार नाही. या सर्व विचारात, संकल्पस्वातंत्र्य असलेला माणूस स्वत:च त्याच्या जीवनातील दुरिताला जबाबदार आहे, ही भूमिका समाईक आहे.

**१. धर्माचे स्वरूप स्पष्ट करा (डिस्क्राईब दि नेचर ऑफ रिलीजन.)**

**उत्तर :** धर्म हा शब्द अनेक अर्थांनी वापरला जातो. त्याच्या अनेक व्याख्या केल्या गेल्या आहेत. धर्मसंकल्पनेची संकुलता व सर्वसमावेशकता लक्षात घेऊन जॉन मार्टिन्यू, फर्म फ्रेजर इत्यादी धर्मशास्त्रज्ञांनी त्यात समाविष्ट होणाऱ्या घटकांची यादी दिली आहे. ती अशी : १) अतिनैसर्गिक बाबींवर म्हणजे देव, दैवतांवर विश्वास,
२) पवित्र व अपवित्र वस्तूंमधील भेदाची भावना व पवित्र वस्तूंबाबत पूज्य बुध्दी, गूढ आकर्षण व व्रत विधी, ३) पवित्र मानलेल्या वस्तूंबाबत काही चूक झाली तर अपराध–भावना, ४) ईश्वराच्या संबंधाने प्रार्थना व अन्य स्वरूपाची निवेदने, ५) वैयक्तिक व सामाजिक नीती यावर आधारित आचरण. थोडक्यात, ईश्वराला केंद्रस्थानी मानून समाजात राहणाऱ्या मानवांच्या वर्तनाचे नियमन करणारी आचारविचारप्रणाली म्हणजे धर्म होय.

**३. धर्म अणि नीती यांचा संबंध स्पष्ट करा (हाऊ आर रिलीजन अँड मॉरॅलिटी रिलेटेड ?)** **उत्तर:**

धर्म आणि नीती यांचा निकट संबंध आहे. या दोन्हींमध्ये प्राधान्याने मानवी आचाराची मीमांसा केली जाते. धर्मात ईश्वरकेंद्रिततेच्या दृष्टीने तर नीतीत समाजाचा एक घटक या नात्याने त्याच्या वर्तनाची चिकित्सा केली जाते. प्रथम धर्म की नीती निर्माण झाली, याबाबत मतभेद आहेत. तथापि ही दोन्ही परस्परावलंबी व परस्परसापेक्ष आहेत असे अनेकांचे मत आहे. अंधश्रध्दाजन्य धर्म हा नीतीचा आधार न मानता व्यक्ती व समाज यांच्या संबंधाला ध्येयदृष्टी देणारी व व्यक्तीवर्तनाचे नियमन करणारी धर्मनिरपेक्ष नीतीही काही विचारवंतांनी प्रतिपादिली आहे. तथापि धर्मनिरपेक्ष नीती अपूर्ण ठरते, असेही काहींनी स्पष्ट केले आहे. नीतीच्या वस्तुनिष्ठतेच्या साहाय्याने ईश्वराच्या अस्तित्वाविषयीचा विचार रॅश्डॉल यांनी मांडला आहे व कांटप्रमाणे सद्‌बुध्दी, कर्तव्याचे आदेश हे परमेश्वर, आत्म्याचे अमरत्व, संकल्पस्वातंत्र्य या नीतीच्या पूर्वगृहीतकांवर (म्हणजे धार्मिकतेवर) आधारित असल्याचे स्पष्ट केले. नीतीला धर्माचा आधार हवाच, असे स्वामी विवेकानंदांनीही म्हटले आहे.

**४. नीतीविरहित धर्म असू शकेल काय? (कॅन देअर बी अ रिलीजन विदाऊट मॉरॅलिटी?)** **उत्तर:**

माणसाच्या स्वाभाविक विवेकनिष्ठेवर भर देणाऱ्या वास्तववादी व नवमानवतावादी रसेल व रॉयसारख्या विचारवंतांनी धर्मविरहित नीतीचा पुरस्कार केला आहे. गौतम बुध्दांनी देखील देव न मानता धर्म–तत्त्वाची शिकवण दिली आहे. तथापि, सखोल विचारांतीं असे लक्षात येते की धर्मविरहित नीती जशी असूच शकत नाही तसाच नीतीविरहित धर्मही असू शकत नाही. धर्मसंकल्पना ही अधिक व्यापक आहे. तिच्यात नीती अंतर्भूत आहे. समाजात राहणाऱ्या मानवांच्या आचरणाची तत्त्वे स्पष्ट ककरण्याचे काम जसे नीतिशास्त्र करते तसेच धर्मशास्त्रातही केले जाते. धर्म, अर्थ, काम व मोक्ष ही मानवी जीवनाची ध्येयसोपानपरंपरा / वर्चस्वश्रेणी आहे. धर्मसंकल्पनेत या चारींचा विचार असतो. यातील धर्म हा पुरूषार्थ म्हणजे नीती होय आणि नैक्तिक आचरणाने साधावयाचे परम ध्येय म्हणजे मोक्ष होय. हे लक्षात घेतले की नीतिविरहित धर्म ही केवळ कल्पना आहे, असे स्पष्ट होते. माणूस धार्मिक आहे पण नीतिमान नाही किंवा नीतिमान आहे पण धार्मिक नाही, या वेडगळ कल्पना आहेत.

**५. आधुनिक काळातील धर्मश्रध्देवर वैज्ञानिक ज्ञानाचा कसा प्रभाव पडला आहे? (हाऊ हॅज् द साईंटिफिक नॉलेज इन्फ्ल्युअन्स्ड रिलीजियस फेथ इन् मॉडर्न इरा?)**

**उत्तर:** शास्त्र, सायन्स, विज्ञान या पारिभाषिक शब्दांनी विशिष्ट पध्दती, दृष्टिकोन व मूल्यप्रणाली निर्देशित केली जाते. मनुष्य, समाज व सृष्टी यांचा अभ्यास करताना विज्ञान हे विमर्शक (क्रिटिकल) आणि बुध्दीशरण (रॅशनल) दृष्टी किंवा निष्ठा स्वीकारते. अशा विज्ञानाचा उपयोग केला गेल्याने / होत असल्याने मानवाचे
क्लेश, कष्ट कमी झाले, यंत्रांच्या वापरामुळे सुखसुविधा वा वैभवात भर पडली. अर्थकारण, शिक्षण, राजकारण, समाजकारण, नीती इत्यादी क्षेत्रातही विज्ञान हे समाजपरिवर्तनाचे तात्त्विक सूत्र बनले. धर्मप्रभावित

परंपरागत जीवनदृष्टीवर विज्ञानाने आघात केले. उद. जाणटोणा व संबंधित अंधश्रध्दाजन्य समजुतींना निरर्थक ठरविले, माणसांना डोळस विवेकनिष्ठा दिली. त्यामुळे धर्मश्रध्देच्या नावाखाली चालणाऱ्या अविवेकी प्रथा, समजुती कमी झाल्या, नष्ट होत गेल्या व चालल्या. पोथीनिष्ठ कर्मकांड व लोकभ्रम यावर विज्ञानाने केलेली विदारक टीका धर्माला उपकारक ठरली, धर्माचे खरे स्वरूप त्यामुळे स्पष्अ होण्यास मदत झाली. ए. एन्. व्हाईटहेड यांनी धर्म व विज्ञान यांच्यातील आंतरक्रियेवर भर दिला, समन्वयवादी भूमिका मांडली. प्रज्ञेच्या प्रकाशात विकसित होणारा धर्म त्यांनी स्पष्ट केला. विज्ञाननिष्ठ ऐहिक जीवन जगतानाही माणूस आत्मिक स्वातंत्र्याला व आनंदाला वंचित होत नाही असा बुध्दिवाद व धर्मश्रध्दा यांचा समन्वयवादी दृष्टिकोन विज्ञानाच्या प्रभावामुळे आधुनिक युगात विकास पावला.

**११. देवविरहित धर्म असू शकतो काय? (कॅन देअर बी रिलीजन विदाऊट गॉड?)**

**उत्तर:** मानवेंद्रनाथ रॉय यांनी आपल्या नवमानवतावादामध्ये माणसाच्या स्वाभाविक विवेकशीलतेवर भर दिला. परिस्थितीच्या संदर्भात विवेकनिष्ठ अशी मानवी प्रतिक्रिया म्हणजे माणसाचे नैतिक जीवन होय. अशा जीवनात सत्याचा शोध व स्वातंत्र्याचे अन्वेषण या प्रेरणा प्रभावी असतात. बर्ट्रांड रसेल यांनी देखील धर्म आणि धार्मिक श्रध्दा ही अविकसित अशा मानवी संस्कृतीच्या बाल्यावस्थेची प्रतीके असल्याचे स्पष्ट केले व सर्व प्रकारच्या धर्मप्रणाली कालांतराने नष्ट होतील, असे विवरण केले आहे. याप्रकारच्या इहवादी, मानवतावादी दृष्टिकोनातून आत्म्याचे अमरत्व व ईश्वराचे अस्तित्व याविषयीच्या युक्तिवादांची निरर्थकता / निराधारता स्पष्ट केली गेली. ईश्वराच्या अस्तित्वाविषयीच्या युक्तिवादात विचाराऐवजी भावनात्मकता व अपेक्षा यांचा प्रभाव अधिक असतो, ईश्वर व आत्म्यावरील विश्वास हा या भीतीवर सुसह्य फुंकर घालणारा उपाय होय. तथापि तो मानवाच्या विवेकशीलतेशी विसंगत होय. नीती व सद्गुणांच्या समर्थनार्थ देवाच्या अस्तित्वावरील विश्वासाची गरज नाही. जीवनमूल्यांचे अधिष्ठान व्यक्ती व समाज यांनी तयार होणारे मानवी विश्व हे होय. देव न मानता मानवी समाजातील चांगुलपणासाठी त्यांनी विवेकशीलता हा प्रमुख आधार म्हणून पर्याय दिला आहे. ही भूमिका सकृद्दर्शनी आकर्षक वाटली तरी तिच्यामुळे माणूस व सृष्टी यांचे संबंध नाकारले जातात. सृष्टी भोगभूमी बनते. प्रेम, करुणा, सहानुभती, आत्मीयता, न्याय, सदिच्छा, सौंदर्य, सत्य ही मूल्ये ज्या तत्त्वातून (देवसंकल्पनेतून) उगम पावतात त्या तत्त्वाकढडे दुर्लक्ष होते. म्हणून देवविरहित धर्म (नीती) ही विचारसरणी अंतिमत: आत्मघातकी ठरते.